# कसा तो दूत माझ्याकडे आला, आणि त्याची सेवकाई

आणि बंधूजन कदाचित…मला येथे अनेक टेप रेकॉर्डर्स दिसत आहेत, आणि ते हे नक्कीच, उचलतील. जेव्हा तुम्हाला पवित्र आत्म्याने तुम्हाला काय सांगितले आहे हे जाणून घ्यायचे असेल, तेव्हा येथे त्या बंधूंना भेटा ज्यांच्याकडे ह्या टेप रेकॉर्डर्स आहेत, ते त्या परत चालू करू शकतात, तुम्हाला तुमचे उत्तर तंतोतंतपणे मिळू शकते. आणि लक्ष ठेवा आणि पहा जर ते जसे सांगितले तसे तंतोतंतपणे घडत नाही का, तुम्हाला समजले. जेव्हा तुम्ही बोलताना ते ऐकता "प्रभू परमेश्वर असे म्हणतो, 'एक विशिष्ट गोष्ट, किंवा *हे असे* आहे,'" किंवा फक्त ते तपासा आणि पहा की ते योग्य आहे की नाही. पहा? ते नेहमीच अशा प्रकारे असते.

2 आता, फक्त थोड्या पार्श्वभूमीसाठी…आणि आज रात्री मला एक प्रकारे आनंद होत आहे की आपल्यापैकी फक्त काही जण येथे आहेत. आपण फक्त घरचे लोक आहोत, नाही का आपण? आपण अनोळखी, नाहीत, आपणापैकी कोणीही नाही. आपण नाही…मी अगदी माझे केंटकी व्याकरण वापरू शकतो आणि आता घरी असल्यासारखे वाटत आहे, कारण आपण आहोत—आपण आहोत…आणि मी आता केंटकीला सोडणार नाही, जर येथे कोणी केंटकीहून असेल तर. केंटकीहून येथे कोणी आहे का? तुमचा हात वर करा. म्हणा! मला अगदी घरी असल्यासारखे वाटले पाहिजे, नाही का? हे खूप चांगले आहे.

3 माझी आई खानावळ चालवित असे. आणि हे शोधण्यासाठी मी एक दिवस तेथे गेलो…तेथे पुरुषांचा एक मोठा समुह आला होता, आणि मोठा, लांब टेबल सेट. आणि मी म्हणालो, "केंटकीहून कितीजण आहेत, उभे रहा." सगळे उभे राहिले. आणि मी त्या रात्री चर्चला गेलो, माझी मंडळी, आणि मी विचारले, "केंटकीहून कितीजण आहेत?" सगळे उभे राहिले. म्हणून मी म्हणेन, "व्वा, ते खूप चांगलं आहे." मिशनऱ्यांनी चांगले काम केले आहे, म्हणून आम्ही त्याचे आभारी आहोत.

4 आता, रोमकरांस पत्रामध्ये, 11वा अध्याय आणि 28वे वचन. पवित्र शास्त्राचे वाचन आता लक्षपूर्वक ऐका.

> *सुवार्तेच्या दृष्टीने पाहता, तुमच्यामुळे ते शत्रू आहेत: परंतु निवडीच्या दृष्टीने पाहता, ते पूर्वजांमुळे…प्रियजन आहेत.*
>
> *कारण देवाला आपल्या कृपादानाचा आणि* पाचारणाचा *अनुताप होत नाही.*

5 आपण प्रार्थना करू या. प्रभु, आज रात्री आम्हाला मदत कर जेव्हा आम्ही आदरपूर्वक याकडे येत आहोत, आपल्या संपूर्ण अंतःकरणाने, प्रामाणिकपणे, केवळ तुझ्या गौरवासाठी या गोष्टी बोलल्या गेल्या आहेत. आणि मला सहाय्य कर, प्रभु, आणि माझ्या मनात केवळ त्याच गोष्टी घाल ज्या मी बोलल्या पाहिजेत आणि किती बोलल्या पाहिजेत. जेव्हा तुझी वेळ असेल तेव्हा मला थांबव. मी विनंती करतो की या श्रोत्यांमधील आजारी आणि गरजूंच्या फायद्यासाठी प्रत्येक अंत:करण हया गोष्टी स्वीकारील. कारण मी ते येशू ख्रिस्ताच्या नावाने मागतो. आमेन.

6 आता, आपण कमी असतानाच मला या विषयाशी संपर्क साधायचा आहे. आणि—आणि मी तुम्हाला जास्त वेळ न थांबवून ठेवण्याचा प्रयत्न करेन, मी येथे माझे घडयाळ ठेवेन आणि तुम्हाला लवकर जाऊ देण्याचा प्रयत्न करेन जेणेकरून तुम्ही उद्या रात्री परत येऊ शकाल. आता, प्रार्थनेत रहा. मला वाटत नाही की मुलाने पत्रके दिली असतील. मी त्याला कधी विचारले नाही की तो...आणि जर त्यांनी तसे केले नाही किंवा त्यांनी केले किंवा नाही केले तरी, काही फरक पडत नाही. जर आम्हाला कोणाला बोलवायचे असल्यास आमच्याकडे येथे पत्रके आहेत. म्हणून, जर नसल्यास, का, आपण केवळ पवित्र आत्मा काय म्हणतो ते पाहू.

7 आता, जर तुम्ही लक्षपूर्वक ऐकाल...आता, हे कदाचित...मी तो असल्याने...आपल्यापैकी फक्त काही लोक इथे आहेत, हे सांगण्याची ही चांगली वेळ आहे, कारण हे—हे माझ्या स्वतःच्या वैयक्तिक अस्तित्वाशी संबंधित आहे. आणि म्हणूनच आज रात्री मी हा पवित्र शास्त्रलेख वाचला आहे, जेणेकरुन तुम्हाला समजेल की कृपादाने आणि पाचारण ही अशी गोष्ट नाही की जी कोणालाही प्राप्त होतील.

8 येथे बोलताना, पौल म्हणत आहे, "यहूदी, सुवार्तेच्या दृष्टीने, कोडगे केले गेले आणि देवापासून दूर केले गेले, ते, आमच्या फायद्यासाठी." पण त्या अगोदरचे वचन, म्हणते, "सर्व इस्राएल लोकांचे तारण होईल." सर्व इस्राएल लोकांचे तारण होईल. निवडीनुसार, देव पित्याने त्यांच्यावर प्रेम केले आणि त्यांना आंधळे केले यासाठी की आम्हा परराष्ट्रीयांना आता पश्चात्तापाची जागा मिळावी, की, अब्राहामाद्वारे, त्याची संतती त्याच्या वचनानुसार सर्व जगाला आशीर्वाद देऊ शकेल. पहा देवाचे सार्वभौमत्व कसे आहे? त्याचा शब्द फक्त असायला हवा. तो तो केवळ दुसरे काहीही असू शकत नाही. आणि आता आपण, त्या द्वारे...देवाने आपली निवड केली आहे; त्याने यहुदी लोकांना निवडले आहे; आणि तो...

9 या सर्व गोष्टी देवाचे पूर्वज्ञान आहे. जेंव्हा तो त्यांच्याबद्दल काय घडेल हे बोलला, त्याला ते आधीच माहीत होते. आता, देव, देव होण्यासाठी, सुरुवातीला त्याला शेवट माहित असणे आवश्यक होते अन्यथा तो अनंत देव नव्हता. कोणाचाही नाश व्हावा अशी देवाची इच्छा नाही. नक्कीच नाही! त्याला कोणाचा नाश होऊ द्यायचा नाही. पण सुरुवातीच्या दिवसांच्या सुरुवातीला हे—हे जग, कोणाचे तारण होईल आणि कोणाचे तारण होणार नाही हे देवाला पूर्णपणे माहीत होते. त्याची इच्छा नव्हती की लोकांचा नाश व्हावा, "त्याची इच्छा नाही की कोणाचा नाश व्हावा, परंतु प्रत्येकाचे तारण व्हावे ही त्याची इच्छा आहे," पण त्याला सुरुवातीपासूनच माहीत होते की कोण वाचणार आणि कोण नाही. हेच कारण आहे की तो अगोदरच सांगू शकतो, "*ही* गोष्ट घडेल. *ती* गोष्ट घडेल," किंवा, "*हे तसेच* असेल. *ही* व्यक्ती *तशीच* असेल." पहा?

10 तो हे अगोदरच ओळखू शकतो कारण तो अनंत आहे. जर तुम्हाला याचा अर्थ माहित असेल तर, ते फक्त असे आहे, "त्याला माहित नाही असे काहीही नाही." पहा, त्याला माहीत आहे. बरं, तेथे पूर्वीपासून काहीही नाही, आणि त्या नंतर ही तेथे आणखी वेळ नसणार, पहा, त्याला तरीही सर्व काही माहित आहे. सर्व काही त्याच्या मनात आहे. आणि मग जसे पौलाने रोमकरांस पत्रात म्हटल्याप्रमाणे, ८वा आणि ९वा अध्याय, "तर मग तो अजून दोष का लावत असतो?" म्हणून आपण ते पाहतो, पण देव...

11 जसे सुवार्तेचा प्रचार करणे. कुणीतरी म्हटलं, "भाऊ ब्रॅन्हम, तुमचा यावर विश्वास आहे का?"

मी म्हणालो, "पहा."

म्हणाले, "आपण कॅल्विनिस्ट असले पाहिजे."

मी म्हणालो, “जोपर्यंत कॅल्विनिस्ट बायबलमध्ये आहे तोपर्यंत मी कॅल्विनिस्ट आहे.”

12 आता, झाडाचा एक अवयव आहे, ते कॅल्व्हिनिझम आहे, परंतु झाडाला आणखी सुद्धा, काही अवयव आहेत. झाडाला एकापेक्षा जास्त अवयव असतात. त्याला ते फक्त शाश्वत सुरक्षिततेमध्ये चालवायचे होते, आणि काही काळानंतर तुम्ही सार्वभौमिकतेमध्ये जाता आणि तुम्ही तिथे कुठेतरी बाहेर पडता, त्याला काही अंत नाही. पण जेव्हा तुम्ही कॅल्व्हिनिझमचा सामना करता, तेव्हा परत येता आणि आर्मिनिझमवर सुरू करता. पहा, झाडावर आणखी एक अवयव आहे, आणि झाडावर आणखी एक अवयव आहे, फक्त चालू ठेवा. संपूर्ण गोष्ट एकत्रितपणे झाड बनवते. त्यामुळे माझा विश्वास…कॅल्व्हिनिझममध्ये—मध्ये आहे जोपर्यंत ते पवित्र शास्त्रामध्ये आहे.

13 आणि माझा विश्वास आहे की जगाच्या स्थापनेपूर्वी देवाला माहित होते, त्याने ख्रिस्तामध्ये त्याची मंडळी निवडली, आणि जगाच्या स्थापनेपूर्वी ख्रिस्ताचा वध केला. पवित्र शास्त्रात असे म्हटले आहे, “तो जगाच्या स्थापनेपासून वधला गेलेला देवाचा कोकरा होता.” पहा? आणि येशूने म्हटले की तो आपल्याला जगाच्या स्थापनेपूर्वी ओळखतो, पौल म्हणतो की, “तो—तो आम्हाला ओळखत होता आणि त्याने मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे आपल्याला येशू ख्रिस्ताच्या द्वारे दत्तक होण्याकरता पूर्वीच नेमले होते जगाच्या स्थापनेपूर्वी.” तो देव आहे. तो आमचा पिता आहे. पहा?

14 म्हणून काळजी करू नका, चाके अगदी उजवीकडे वळत आहेत, सर्वकाही वेळेवर होत आहे. फक्त एकच गोष्ट, आहे, क्रमवार होऊ द्या. आणि तो एक—तो एक त्याविषयी एक चांगला भाग आहे, नंतर जेव्हा आपण क्रमवार येता तेव्हा कसे कार्य करावे हे आपल्याला समजते.

15 आता, आता लक्षात घ्या, “कृपादाने आणि पाचारण पश्चात्तापाविना आहेत,” हा एकमेव मार्ग आहे की मी प्रभूमध्ये माझे पाचारण शास्त्रवचनानुसार ओळखू शकतो—शकतो. आणि विश्वास ठेवतो की मी आज रात्री अशा मित्रांसोबत आहे ज्यांना हे नक्कीच समजेल आणि ते वैयक्तिक आहे असे वाटणार नाही, परंतु तुम्हाला कदाचित एक समज असू शकेल आणि फक्त काय आहे हे समजेल परमेश्वर काय—काय म्हणाला आहे की तो करील, आणि काहीतरी हालचाल करणारे शोधता आणि नंतर त्याचे अनुकरण करता.

16 आता, सुरुवातीला, पहिली गोष्ट जी मला आठवते ती म्हणजे एक दृष्टान्त. मला माझ्या मनाची पहिली गोष्ट आठवते ती म्हणजे परमेश्वराने मला दिलेला दृष्टान्त. आणि तो अनेक, अनेक वर्षांपूर्वी होता, मी एक लहान मुलगा होतो. आणि माझ्या हातात एक दगड होता.

17 आता, मी तुमची माफी मागतो, मला आठवते की मी लांब पोशाख घातला होता. लहान मुलं जेव्हा लांब कपडे घालायची तेव्हा तुम्ही (तुम्ही सर्व) लक्षात ठेवण्याइतपत प्रौढ आहात की नाही हे मला माहीत नाही. इथे किती जणांना आठवते जेव्हा मुले, होय, लांब कपडे घालीत होते? बरं, मला आठवतंय, आम्ही जेथे राहायचो तेथे माझ्या जुन्या झोपडीत, मी जमिनीवर रांगत होतो. आणि ते कोणीतरी होते, मला माहित नाही की ते कोण होते, आत आले. आणि आईने माझ्या ड्रेसमध्ये निळ्या रिबिनीने थोडे—थोडे काम केले होते. आणि मला नुकताच चालता येऊ लागले होते. पण मी तेव्हा रांगत होतो, आणि मी माझे बोट बर्फात त्यांच्या पायावर अडकवले, आणि त्याच्या पायावरचा बर्फ खात होतो जो शेकोटीच्या शेजारी उभं राहून, उब घेत होता. मला आठवते की माझी आई यासाठी मला धक्का देऊन ओढत होती.

18 आणि मग पुढची गोष्ट मला आठवते, जवळजवळ दोन वर्षां नंतरची, माझ्याकडे एक लहानसा दगड होता. आणि तेव्हा मी सुमारे तीन वर्षांचा असेल, आणि माझा लहान भाऊ तेव्हा जवळजवळ दोन वर्षांचाही नसेल. आणि म्हणून आम्ही मागील अंगणात बाहेर होतो जेथे फक्त एक जुने मागील अंगण होते जेथे ते लाकूड आणायचे आणि लाकूड तोडायचे. किती जणांना ते दिवस आठवतात जेव्हा तुम्ही मागच्या अंगणात लाकूड ओढायचे आणि ते तोंडायचे? आज रात्री मी टाय का घातली आहे? मी—मी घरीच आहे.

19 मग जेव्हा ते...बाहेर जुन्या मागील अंगणात एक छोटीशी फांदी होती जी तेथून खाली, झऱ्यांतून येते. तेथे त्या झऱ्याजवळ एक जूना पऱ्या होता जो बुडवून आम्ही आमचे पाणी काढीत असू आणि ते एका जुन्या बादलीत ठेवत, जुन्या देवदाराच्या बादलीत, आणि खाली आणीत.

20 मला आठवते की मी शेवटच्या वेळी माझ्या लहान, वृद्ध आजीला तिच्या मृत्यूपूर्वी पाहिले होते, ती एकशे दहा वर्षांची होती. आणि जेव्हा ती मेली, तेव्हा मी तिला माझ्या हातात उचलले आणि मरण्यापूर्वी तिला असेच धरले. जेव्हा ती मेली, तिने तिचे हात माझ्याभोवती ठेवले आणि म्हणाली, "लाडक्या, देव तुझ्या आत्म्याला, आता आणि सदैव, आशीर्वाद देवो".

21 आणि मला वाटत नाही की त्या महिलेकडे कधीही, तिच्या आयुष्यात, एक—एक तिच्या स्वतःच्या बुटांची जोडी होती. आणि मी तिला पाहिलेलं आठवतं आहे, आणि जेव्हा मी एक तरुण होतो, त्यांना भेटायला खाली जायचो, रोज सकाळी ती उठायची, अनवाणी पायाने, आणि त्या बर्फातून झऱ्याजवळ जायची, एक बादली पाणी घेत असे आणि परत येई, तिचे पाय त्यातच असत. त्यामुळे तुम्हाला त्रास होत नाही, ती एकशे दहा वर्षे जगली. म्हणून (होय, महाशय) ती खूप, खूप दणकट, होती.

22 तेव्हा मला आठवते की ती मला गोटयांबद्दल सांगणार होती जे माझे वडिल लहान असताना खेळायचे. "आणि ती बिचारी जुनी गोष्ट," मला वाटले, "ती त्या पोटमाळ्यात कशी उठायची आहे?" एक छोटीशी, जुनी दोन खोल्यांची झोपडी, आणि तिथे एक पोटमाळा होता. आणि त्यांनी दोन रोपटे कापली, आणि वर जाण्यासाठी, एक शिडी बनवली. बरं, मी म्हटलं...

23 बरं, आता ती म्हणाली, "आता, रात्रीच्या जेवणानंतर मी तुम्हाला सांगणार आहे, तुम्हाला तुझ्या—तुझ्या बाबांच्या संगमवरी गोट्या दाखवणार आहे."

आणि मी म्हणालो, "ठीक आहे."

24 म्हणून ती मला ते दाखवणार होती, वरच्या मजल्यावरील एका ट्रंकमध्ये जिथे तिने तिचे सामान जुन्या लोकांप्रमाणे ठेवले होते. आणि मला वाटलं, "जगात ती बिचारी म्हातारी त्या शिडीवर कशी चढणार?" म्हणून मी तिकडे गेलो आणि म्हणालो, "आजी," मी म्हणालो, "आता, थांब, प्रिये, मी येथे वर जाईन आणि तुला मदत करीन."

25 ती म्हणाली, "बाजूला उभा रहा." त्या शिडीवर ती खारीसारखी गेली. ती म्हणाली, "बरं, वर ये!"

आणि मी म्हणालो, "ठीक आहे, आजी."

26 मला वाटले, "अरे, बाप रे, जर मी तिच्यासारखा असतो तर, माझ्यामध्ये तेवढी शक्ती, वयाच्या एकशे दहाव्या वर्षी!"

27 आता, तेव्हा मला आठवतंय की या लहानशा जुन्या झऱ्यावर होतो, आणि माझ्याकडे एक दगड होता आणि माझ्या लहान भावाला मी किती मजबूत आहे, हे दाखवण्याचा

प्रयत्न करत, चिखलात खाली फेकत होतो. आणि झाडावर एक पक्षी बसला होता आणि तो किलबिलाट करत होता, आजूबाजूला फिरत होता, एक लहान रॉबिन पक्षी किंवा कोणीतरी. आणि, लहान रॉबिन, मला वाटले की तो माझ्याशी बोलला. आणि मी वळून ऐकले, आणि पक्षी उडून गेला, आणि एक वाणी म्हणाली, "तु तुझ्या आयुष्याचा मोठा भाग न्यू अल्बनी नावाच्या शहराजवळ घालवणार आहेस."

28 मी जिथे वाढलो तेथून ते तीन मैलावर आहे. सुमारे एक वर्षानंतर, त्या ठिकाणी गेलो, न्यू अल्बनी...येथे कधीही जाण्याची कल्पना नव्हती. आयुष्यभर, त्या गोष्टी कशा...

29 आता, बघा, माझे लोक धार्मिक नव्हते. माझे वडील आणि आई चर्चला गेले नाहीत. त्यापूर्वी, ते कॅथलिक होते.

30 माझा छोटा पुतण्या आज रात्री इथे कुठेतरी बसला आहे, मला वाटतं, मला माहित नाही. तो एक सैनिक आहे. मी त्याच्यासाठी प्रार्थना करीत आहे. तो स्वतः कॅथलिक आहे, अजूनही कॅथलिक आहे. आणि काल संध्याकाळी, जेव्हा तो येथे होता आणि त्याने त्या देवाच्या गोष्टी पाहिल्या, तेव्हा तो तिथेच व्यासपीठावर उभा होता. तो, तिथेच उभा राहून म्हणाला, "अंकल बिल?" तो बराच काळापासून, परदेशात आहे, म्हणाला, "जेव्हा मी ते पाहिले..." म्हणाला, "तसे—तसे कॅथलिक चर्चमध्ये घडत नाही." तो म्हणाला, "ते...माझा—माझा विश्वास आहे, अंकल बिल, तुम्ही बरोबर आहात," तो म्हणाला.

31 आणि म्हणून मी म्हणालो, "लाडक्या, *मी* बरोबर नाही, तोच बरोबर आहे. पहा, *तो* बरोबर आहे." आणि म्हणून तो म्हणाला...मी म्हणालो, "आता, मी तुला काहीही करण्यास सांगत नाही, मेलविन, परंतु फक्त प्रभू येशू ख्रिस्ताची मनापासून सेवा कर. तु कुठेही जा जेथे तुला जायचे आहे. पण खात्री बाळग की तुझ्या अंत:करणात, येशू ख्रिस्ताचा नव्याने जन्म झाला आहे, पहा, तुझ्या अंत:करणात. त्यानंतर तुला पाहिजे असलेल्या कोणत्याही चर्चमध्ये जा."

32 आता, पण माझ्या आधीचे लोक कॅथलिक होते. माझे वडील आयरिश आणि माझी आई आयरिश होती. फक्त एकच फोड आयरिश रक्तात आहे, माझी आजी चेरोकी इंडियन होती. माझी आई यामुळे मिश्रजातीय आहे. आणि मग मी...माझ्यासाठी, ते माझे...आमची पिढी, तिसऱ्या पिढीनंतर ती लुप्त झाली. पण काटेकोरपणे आयरिश असण्यात हा एकमेव खंड आहे, हार्वे आणि ब्रॅन्हम हे नाव होते. आणि मग त्यामागे लियोन्स होते, जे अजूनही आयरिश आहे. आणि मग ते सर्व कॅथलिक होते. पण माझ्याविषयी, लहानपणी आम्हाला कोणतेही धार्मिक प्रशिक्षण किंवा शिकवण नव्हती.

33 पण ती कृपादाने, ते दृष्टान्त, मी तेव्हाही दृष्टान्त पाहिले जसे मी आता पाहतो, ते बरोबर आहे, कारण कृपादाने आणि पाचारण पश्चात्तापविना आहेत. हे देवाचे पूर्वज्ञान आहे, देव काहीतरी करत आहे. आयुष्यभर मला याबद्दल काहीही बोलण्याची भीती वाटत होती.

34 तुम्ही माझी कथा *जीझस क्राइस्ट द सेम यस्टर्डे, टुडे, अँड फॉरेव्हर* या छोट्या पुस्तकात वाचली आहे. मला वाटते की ते काही, ह्या इतर पुस्तकांमध्ये आहे. ते बरोबर आहे, जीन? ते ह्या नियमित—नियमित पुस्तकामध्ये आहे का, आता आपल्याकडे असलेल्या पुस्तकामध्ये—मध्ये आहे? ती, *जीवन कथा* आहे का? मला वाटते ती आहे. तर आपल्याकडे केव्हा होते...ते भयंकर नाही का? माझी स्वतःची पुस्तके, आणि मी स्वतः, ती कधीच वाचलेली नाहीत. परंतु दुसरे कोणीतरी ती लिहितात, त्यामुळे ते असे काहीतरी आहे जे त्यांनी सभेमध्ये घेतलेले आहे. मी यातून गेलो आहे, म्हणून, मी नेहमी काहीतरी घडण्याची वाट पाहत असतो. तर, मग, ते ठीक आहेत, जेव्हा मला संधी मिळाली मी त्यांचे काही भाग आता, इथे आणि तेथे, वाचलेले आहेत.

35 आणि आता, असं असलं तरी, एक—एक लहान मुलगा म्हणून, तुम्हाला माहित आहे हे दृष्टान्त माझ्याशी कसे बोलले, मी सुमारे सात वर्षांचा होतो, आणि म्हटले, “मद्यपान किंवा धुम्रपान करू नकोस किंवा कोणत्याही प्रकारे आपले शरीर दूषित करू नकोस, तु मोठा झाल्यावर तुझ्यासाठी एक काम असेल.” आणि तुम्ही पुस्तकात सांगितलेलं ऐकलं आहे. बरं, ते बरोबर आहे. हे सर्व घडत राहिले.

36 जेव्हा मी एक सेवक झालो, बरं, त्यानंतर ते—त्यानंतर ते खरोखरच नेहमीच घडू लागले.

37 आणि मी एका रात्री आपल्या प्रभु येशूला पाहिले. मी हे पवित्र आत्म्याच्या परवानगीने सांगत आहे, माझा विश्वास आहे. प्रभूचा देवदूत जो येतो तो प्रभु येशू नाही. तो त्याच दृष्टांतात त्याच्यासारखा दिसत नाही. कारण, मी प्रभू येशूचा जो दृष्टान्त पाहिला, तो एक ठेंगणा मनुष्य होता. तो नव्हता…मी माझ्या वडिलांसाठी प्रार्थना करण्यासाठी, शेतात गेलो होतो. आणि मी परत आलो आणि मी झोपण्यास गेलो, आणि त्या रात्री मी याच्याकडे पाहिले आणि मी—मी म्हणालो, “हे देवा, त्याला वाचव!”

38 माझ्या आईचे आधीच तारण झाले आहे आणि मी तिचा बाप्तिस्मा केला. मग मला वाटलं, “अरे, माझे बाबा इतके पितात.” आणि मला वाटलं, “जर मी त्यांना प्रभू येशूचा स्वीकार करायला लावू शकलो तर!” मी बाहेर पडलो, समोरच्या खोलीत, दरवाजाजवळच्या, एका पुढच्या खोलीतील जुन्या फळीवर झोपलो.

39 आणि कोणीतरी मला म्हणाले, “उठ.” आणि मी उठलो, चालत गेलो, आणि माझ्या मागच्या शेतात गेलो, एक पिवळ्या फुलांचे शेत.

40 आणि तेथे, एक मनुष्य उभा होता; तो माझ्यापासून दहा फुटांपेक्षा कमी अंतरावर उभा होता, पांढरा पोशाख घातलेला, एक ठेंगणा मनुष्य; त्याचे हात *असे* दुमडलेले होते; दाढी असलेला, एक प्रकारे लहान; त्याच्या खांद्यावर केस होते; आणि तो मजपासून बाजूला पाहत होता, त्यासारखा; शांत दिसणारी आकृती. पण मला ते समजू शकले नाही, त्याचे पाय कसे, एक दुसऱ्याच्या मागे. आणि वारा वाहत होता, त्याचा झगा हलत होता, रोपे डुलत होती.

41 मला वाटले, “आता, एक मिनिट थांब.” मी स्वत:चा चावा घेतला. मी म्हणालो, “आता, मी झोपलेलो नाही.” आणि मी खाली खेचले, त्या रोपाचा एक छोटासा तुकडा काढला, तुम्हाला माहिती आहे, त्यात काडीसारखे मिळाले. मी ती माझ्या तोंडात टाकली. मी परत घराकडे पाहिलं. मी म्हणालो, “नाही, मी तेथे वडिलांसाठी प्रार्थना करत होतो, आणि कोणीतरी म्हटले की इथे बाहेर ये, आणि हा मनुष्य येथे उभा आहे.”

42 मला वाटले, “तो प्रभू येशूसारखा दिसतो.” मला वाटले, “मला आश्चर्य वाटेल जर तो असेल?” तो अगदी तंतोतंतपणे, थेट त्या दिशेने पाहत होता जेथे आता आमचे घर आहे. म्हणून मी त्याला पाहू शकतो की नाही हे पाहण्यासाठी मी *या* मार्गावर फिरलो. आणि मला त्याच्या चेहऱ्याची बाजू अशा प्रकारे दिसत होती. पण तो…त्याला पाहण्यासाठी मला *ह्या* वाटेने वळावे लागणार होते. आणि मी म्हणालो, “अहं!” त्याला कधीच हलवू नको. आणि मला वाटलं, “मी कल्पना केली की मी त्याला हाक मारेन.” आणि मी म्हणालो, “येशू.” आणि जेव्हा त्याने तसे केले, तेव्हा त्याने आजूबाजूला *असे* पाहिले. मला एवढेच आठवते, त्याने नुकतेच त्याचे हात पुढे केले.

43 जगात असा एकही कलाकार नाही जो त्याचे चित्र, त्याच्या चेहऱ्याचे भाव रंगवू शकेल. मी आजवर पाहिलेले सर्वोत्तम चित्र हे हॉफमनचे *हेड ऑफ क्राइस्ट ॲट थर्टी*–

*श्री*, मी ते सर्व साहित्य आणि मी वापरत असलेल्या प्रत्येक गोष्टीवर लावले आहे. कारण ते अगदी त्यासारखे दिसते, आणि तर मग...किंवा बरेचसे जवळ, शक्य तितके जवळ आहे.

44 तो मनुष्यासारखा दिसत होता, जर तो बोलला तर जगाचा अंत होईल, आणि तरीही तुमच्या—तुमच्याबद्दल इतके प्रेम आणि दयाळूपण...मी अगदी धाडकन पडलो. आणि दिवसा ढवळ्या, मी स्वतःला भर दुपारी, शर्ट आणि पायजमा अश्रूंनी भिजलेला पाहिला, जेव्हा मला त्याची जाणीव झाली, चालत, पिवळ्या फुलांच्या शेतांतून, घरी परतलो.

45 मी ते माझ्या एका सेवक मित्राला सांगितले. तो म्हणाला, “बिली, ते तुला वेड लावेल.” तो म्हणाला, “तो सैतान आहे.” आणि म्हटले, “असे काहीही करून तुझी फसवणूक करू नको.” मी त्यावेळी बाप्टिस्ट सेवक होतो.

46 मग, मी माझ्या आणखी एका जुन्या मित्राकडे गेलो. मी खाली बसलो आणि त्याला याबद्दल सांगितले. मी म्हणालो, “बंधु, तुला याबद्दल काय वाटते?”

47 तो म्हणाला, “बरं, बिली, मी तुला सांगेन.” तो म्हणाला, “माझा विश्वास आहे की जर तु तुझे जीवन, जसे बायबलमध्ये सांगितले आहे तसे ठेवशील, देवाची कृपा आणि अशा प्रकारे, मी अशा प्रकारच्या, काही विलक्षण गोष्टींच्या मागे जाणार नाही.”

48 मी म्हणालो, “श्रीमान, मला काही विलक्षण गोष्टींच्या मागे जायचे नाही.” मी म्हणालो, “हे काय आहे हे शोधण्याचा मी केवळ प्रयत्न करत आहे.”

49 तो म्हणाला, “बिली, वर्षांपूर्वी त्यांच्याकडे त्या गोष्टी चर्चमध्ये होत्या. परंतु,” म्हणाला, “जेव्हा प्रेषित निघून गेले, तेव्हा त्या गोष्टी त्यांच्यासह थांबल्या.” आणि म्हणाले, “आता आमच्याकडे फक्त एकच गोष्ट आहे...त्या गोष्टी पाहणे,” म्हणाला, “हे अध्यात्मवादी, भुते आहेत.”

मी म्हणालो, “ओ ब्रदर मॅककिनी, तुम्हाला असे म्हणायचे आहे?”

तो म्हणाला, “होय, श्रीमान.”

मी म्हणालो, “हे देवा, माझ्यावर दया कर!”

50 मी म्हणालो, “मी—मी...अरे, बंधू मॅककिनी, तुम्ही कराल का—तुम्ही माझ्यासोबत प्रार्थनेत सामील व्हाल का की देव माझ्या बाबतीत असत कधीच होऊ देणार नाही? तुला माहित आहे की मी त्याच्यावर प्रेम करतो आणि मला या गोष्टींमध्ये चूक करायची नाही.” मी म्हणालो, “तू माझ्याबरोबर प्रार्थना कर.”

51 तो म्हणाला, “मी करेन, भाऊ बिली.” आणि म्हणून आम्ही तेथेच त्या निवासस्थानामध्ये—मध्ये प्रार्थना केली.

52 मी अनेक सेवकांना विचारले. तीच गोष्ट व्हायची. मग मला त्यांना विचारायला भीती वाटू लागली, कारण त्यांना वाटले असेल की मी भूत आहे. म्हणून मी—मला तसे व्हायचे नव्हते. माझ्या मनात काहीतरी घडले हे मला कळले. आता, ते सर्व आहे, तेथे—तेथे माझ्या हृदयात काहीतरी घडले होते. आणि मला तसे व्हायचे नव्हते, कधीच नाही.

53 म्हणून नंतर काही वर्षांनी, मी एके दिवशी फर्स्ट बॅप्टिस्ट चर्चमध्ये ऐकले जेथे मी त्यावेळी सदस्य होतो, मी कोणाला तरी म्हणताना ऐकले, “म्हणाले, काल रात्री तुम्ही जाऊन त्या देवाविषयी वेड्या लोकांना ऐकायला हवे होते.”

54 आणि मला वाटले, “देवाविषयी वेडी लोक?” आणि माझा एक मित्र, वॉल्ट जॉन्सन, बास गायक, आणि मी म्हणालो, “ते काय होते, भाऊ वॉल्ट?”

तो म्हणाला, “या पेंटेकोस्टलांचा समुह.”

मी म्हणालो, “काय?”

55 त्याने म्हटले, “पेन्टेकॉस्टल!” म्हणाले, “बिली, तु ते कधी पाहिले आहेस,” म्हणाला, “ते असे जमिनीवर लोळत होते आणि वर–खाली उडया मारीत होते.” आणि म्हणाले, “ते म्हणाले की त्यांना कोणत्या तरी अज्ञात भाषेत बोलावे लागे अन्यथा त्यांचे—त्यांचे तारण झाले नसेल.”

आणि मी म्हणालो, “ते कुठे आहेत?”

56 “अरे,” म्हणाला, “लुईव्हिलेच्या दुसऱ्या बाजूला, तेथे एक लहानशी जुन्या पद्धतीची तंबू सभा.” म्हणाले, “अर्थातच, कृष्णवर्णीय लोक.”

आणि मी म्हणालो, “उह–हह.”

आणि तो म्हणाला, “तेथे बरेच श्वेतवर्णीय लोक आहेत.”

मी म्हणालो, “त्यांनीही, तसेच केले का?”

म्हणाले, “होय, होय! त्यांनीही, तसेच केले.”

57 मी म्हणालो, “हे मजेशीर आहे, लोकं अशा गोष्टींमध्ये मिसळतात.” मी म्हणालो, “बरं, मला वाटतं की आपल्याकडे ही फक्त त्या गोष्टी असल्या पाहिजेत.” त्या रविवारी सकाळी, मी ते कधीही विसरणार नाही. त्याला अपचन झाले होते म्हणून तो सुक्या संत्र्याचा तुकडा खात होता, आणि तो काल होता तसाच मला दिसत होता. आणि मला वाटते, “गोंधळ करणे, वर–खाली उड्या मारणे, त्यांना पुढे कोणते धर्म मिळणार आहेत?” आणि म्हणून मी—मी पुढे गेलो.

58 त्यानंतर, मला एक वृद्ध माणूस भेटला जो आता चर्चमध्ये आहे कदाचित आता, किंवा तो येथे चर्चमध्ये, जॉन रायनच्या नावाने होता. आणि मी त्याला एके ठिकाणी भेटलो…लांब दाढी आणि केस असलेला म्हातारा व्यक्ति, आणि तो कदाचित येथे असेल. मला वाटते की तो बेंटन हार्बर येथून, हाऊस ऑफ डेव्हिड येथे आला होता.

59 आणि लुईव्हिलमध्ये त्यांची जागा होती. मी त्या लोकांना शोधण्याचा प्रयत्न करत होतो, आणि ते याला संदेष्ट्यांची शाळा म्हणून संबोधतात. म्हणून मला वाटले की मी वर जाऊन ते काय आहे ते पहावे. बरं, मला कोणीही जमिनीवर लोळताना दिसलं नाही, पण त्यांच्याकडे काही विचित्र शिकवणी होत्या. आणि तेथेच मी या वृद्ध व्यक्तिला भेटलो, त्याने मला त्याच्या घरी येण्यासाठी आमंत्रित केले.

60 मी सुट्टीसाठी वर गेलो होतो. आणि एके दिवशी मी तेथे होतो, आणि मी त्याच्या घरी परत गेलो आणि तो गेला होता, आणि तो इंडियानापोलिसमध्ये कुठेतरी गेला होता. त्याची पत्नी म्हणाली, “परमेश्वराने त्याला बोलावले,”

मी म्हणालो, “तुम्हाला असे म्हणायचे आहे की तुम्ही त्या माणसाला असे पळून जाऊ दिले?”

61 ती म्हणाली, “अरे, तो देवाचा सेवक आहे!” ती बिचारी काही आठवड्यांपूर्वी मरण पावली, मी ऐकले. आणि ती त्याच्याशी एकनिष्ठ होती. खरेच, अशीच पत्नी असायला हवी! ते बरोबर आहे. बरोबर असो वा चूक, तो कसेही योग्य आहे! मी म्हणालो…बरं, मला ठाऊक आहे ते…

62 आता तो…भाऊ रायन, तू येथे आहेस का? तो येथे नाही. तो इतर दिवशी होता, नाही का मुलांनो?

63 बरं, ते जे काही मिळवू शकतात त्यावरच ते जगतात, आणि त्याच्याकडे घरात खायला काहीच नव्हतं. ते बरोबर आहे. आणि मी मिशिगनमधील, एका तलावात किंवा तलावात काही मासे पकडले होते, आणि मी परत खाली आलो—आणि मी परत त्या ठिकाणी आलो. आणि त्यांच्याकडे मासे शिजवण्यासाठी, घरात स्वयंपाकात वापरण्याची डुकराची चरबी, किंवा तेल देखील नव्हते. आणि मी म्हणालो, "त्याने तुला घरात काहीही न ठेवता सोडले?"

म्हणाले, "अरे, पण तो देवाचा सेवक आहे, भाऊ बिल!" म्हणाली, "तो…"

64 आणि मी विचार केला, "बरं, तुझे विशाल हृदय आशीर्वाद होवो. बंधु, मी तुझ्या पाठीशी उभा राहीन." ते बरोबर आहे. "तु तुझ्या नवऱ्याचा इतका विचार करते, मी त्यासाठी तुला साथ देण्यास आणि तुझ्या पाठीशी उभा राहण्यास तयार आहे." ते बरोबर आहे. आज आपल्याला अशा अधिक स्त्रियांची आणि अधिक पुरुषांची गरज आहे जे अशा प्रकारे आपल्या बायकोचा विचार करतात. ते बरोबर आहे. जर पती-पत्नी अशा प्रकारे एकत्र आले तर अधिक चांगली अमेरिका होईल. बरोबर असो किंवा चूक, त्यांच्यासोबत रहा. इतके घटस्फोट होणार नाहीत.

65 तर आम्ही—आम्ही गेलो…मग मी पुढे निघालो. आणि माझ्या घराच्या रस्त्यावर, ही एक विचित्र गोष्ट होती, मी मिशावाकामधून आलो. आणि मी आता काही—काही जुन्या गाड्या, रस्त्यावर लावलेल्या पहिल्या, म्हटले होते…त्यांच्यावर मोठी चिन्हे होती लिहिले होते, "केवळ येशू." मला वाटले, "हे काय…'केवळ येशू,' ते धार्मिक असले पाहिजे." आणि मी येथे गेलो आणि येथे सायकली होत्या त्यावर लिहिले होते, "केवळ येशू." कॅडिलॅक्स, मॉडेल-टी फोर्ड, सर्वांवर, "केवळ येशू" त्यावर लिहीले होते. मी विचार केला, "बरं, आश्चर्य वाटलं की ते काय आहे?"

66 म्हणून मी आजूबाजूला त्याचा पाठपुरावा केला; शोधण्यास आलो, ती एक धार्मिक सभा होती, पंधराशे ते दोन हजार लोक तेथे होते. आणि मी तेथे सर्वांना ओरडताना आणि वर-खाली उडया मारताना ऐकले, आणि असे चालू होते. मला वाटले, "म्हणालो, होली-रोलर्स म्हणजे काय ते मी येथेच बघेन."

67 तर माझ्याकडे माझी जुनी फोर्ड गाडी होती, तुम्हाला माहिती आहे, की मी दावा केला होता की ती तासाला तीस मैल जाते, पंधरा *या* मार्गाने आणि पंधरा वर-खाली *या* मार्गाने. म्हणून मी ते एका बाजूला ओढले, मी…जेव्हा मला पार्क करण्यासाठी जागा मिळाली, आणि मी रस्त्यावर परतलो. आत गेलो, आजूबाजूला पाहिले, आणि प्रत्येकजण उभे होते ज्यांना उभे राहणे शक्य होते. मला त्यांच्या डोक्यावरून पहावे लागत होते. आणि ते ओरडत होते, उडया मारत होते, आणि पडत होते, आणि असे चालले होते. मला विचार केला, "वाह, अरे, काय लोक आहेत ते!"

68 पण जितका वेळ मी तेथे उभा राहिलो, तितके मला अधिक बरे वाटले. मला वाटले, "ते खूपच चांगले दिसत आहे." मला वाटले, "त्या लोकांमध्ये काहीही चूकीचे नाही. ते वेडे नाहीत." मला त्यांच्यापैकी काहींशी बोलायला मिळाले, म्हणून ते—ते चांगले लोक होते. म्हणून मी म्हणालो…

69 बरं, आता, त्याच सभेत मी बाहेर गेलो आणि त्या रात्री रात्रभर राहिलो, आणि दुसऱ्या दिवशी मी आत गेलो. आणि तुम्ही मला माझ्या जीवनकथेत हे सांगताना ऐकले आहे. मी व्यासपीठावर, दीडशे किंवा दोनशे सेवकांसह होतो, आणि कदाचित त्याहून अधिक, आणि प्रत्येकाने उठून ते कोठून आहेत हे सांगावे अशी त्यांची इच्छा होती. आणि

मी म्हणालो, “सुवार्तिक विल्यम ब्रॅन्हम, जेफरसनविले,” खाली बसलो, “बाप्टिस्ट,” म्हणून, खाली बसलो. ते कोठून आले ते प्रत्येकजणाने सांगितले.

70 म्हणून दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा मी तेथे होतो…तुम्हाला माहिती आहे, मी त्या रात्री रात्रभर शेतात झोपलो, आणि माझी पॅन्ट फोर्डच्या दोन सीटमध्ये दाबली, आणि मी—मी…जुनी सीअरसकर पॅन्ट, छोटा टी शर्ट, तुम्हाला माहिती आहे. तर दुसऱ्या दिवशी सकाळी मी सभेला गेलो, मी छोटा टी शर्ट घातलेला होता. मी गेलो होतो…

71 माझ्याकडे फक्त तीन डॉलर्स व्यतिरिक्त काहीही नव्हते, आणि मला घरी जाण्यासाठी पुरेसे पेट्रोल घ्यायचे होते. आणि मग मी—माझ्याकडे काही रोल होते, थोडेसे शिळे, तुम्हाला माहिती आहे, पण मी ठीक होतो. आणि मी एका पाणीवाल्याकडे गेलो, माझ्यासाठी एक ग्लास पाणी आणले, तुम्हाला माहिती आहे, आणि ते खूप चांगले होते. म्हणून मी त्यांना थोडे भिजवले होते, आणि नाश्ता केला.

72 आता, मी त्या सोबत खावू शकत होतो, आता, ते दिवसातून दोनदा जेवण करीत. पण मी अर्पणामध्ये काहीही टाकू शकत नव्हतो, म्हणून मी करणार नाही—त्यांच्यावर बोज टाकणार नाही.

73 तर मग मी—मग मी सकाळी तेथे पोहोचलो, ते म्हणाले…मला फक्त त्याचा हा भाग सांगायचा होता. आणि त्या दिवशी सकाळी तेथे पोहोचलो, आणि ते म्हणाले, “आम्ही विल्यम ब्रॅन्हमना शोधत आहोत, एक तरुण सुवार्तिक जो काल रात्री व्यासपीठावर होता, एक बाप्टिस्ट.” म्हणाले, “आज सकाळी त्याने संदेश दयावा अशी आमची इच्छा आहे.” मला वाटले की, लोकांचा तो समुह, तो मला फार खेचत होता, मी एक बाप्टिस्ट आहे. म्हणून मी माझ्या सीटवर खाली वाकलो. माझ्या अंगावर सीरसकर पॅन्ट आणि टी शर्ट होता; तुम्हाला माहिती आहे, आणि आम्ही कारकुनी परिधान केले, म्हणून…आणि मी अशा प्रकारे मागे सीटवर बसलो. म्हणून त्याने दोन–तीन वेळा विचारले. आणि मी एका कृष्णवर्णीय भावाशेजारी बसलो होतो.

74 आणि उत्तरेत त्यांचे अधिवेशन असण्याचे कारण, कारण दक्षिणेत तेव्हा वर्गीकरण चालू होते. त्यामुळे त्यांना ते दक्षिणेत करता आले नाही.

75 तर मला जिज्ञासा वाटली की हे “केवळ येशू” काय होते. आणि मला वाटलं, “जोपर्यंत तो येशू आहे, तोपर्यंत सर्व ठीक आहे. त्यामुळे मला काहीही फरक पडत नव्हता की ते…ते कसे आहे, जोपर्यंत तो आहे तोपर्यंत.”

76 म्हणून मी तेथे थोडा वेळ बसलो आणि त्यांचे निरीक्षण केले, आणि म्हणून त्यांनी आणखी दोन–तीन वेळा पुकारले. आणि ह्या कृष्णवर्णीय भावाने माझ्याकडे पाहिले, तो म्हणाला, “तुम्ही त्याला ओळखता का?” मी—मी—मी…तेथे अंत झाला. मी त्या माणसाशी खोटे बोलू शकत नव्हतो, माझी इच्छा नव्हती.

मी म्हणालो, “बघ, बंधु. होय, मी त्याला ओळखतो.”

तो म्हणाला, “बरं, जा त्याला घेऊन ये.”

77 मी म्हणालो, “बरं, मी—मी तुला सांगेन, बंधु,” मी म्हणालो, “मी तो आहे. पण, तुम्ही पहा,” मी म्हणालो, “पाहा, मी…या सीरसकर ट्राउझर्स.”

“तेथे वर जा.”

78 आणि मी म्हणालो, “नाही, मी तेथे वर जाऊ शकत नाही,” मी म्हणालो, “या पॅन्टसह, याप्रकारे, हा छोटा टी शर्ट.”

म्हणाले, "तुम्ही कसे कपडे घालता याची त्यांना पर्वा नाही."

79 आणि मी म्हणालो, "बरं, बघ, तु त्याचा उल्लेख केला नाहीस का. ऐक?" मी म्हणालो, "बघ, मी ही सीरसकर ट्राउझर्स घातली आहेत, मला तेथे वर जायचे नाही."

म्हणाले, "कोणाला माहीत आहे की विल्यम ब्रॅन्हम कोठे आहेत?"

त्याने म्हटले, "तो येथे आहे! तो येथे आहे!"

80 अरे देवा! माझा चेहरा एकदम लाल, तुम्हाला माहिती आहे; आणि टाय न घातलेला, तुम्हाला माहिती आहे; आणि हा छोटासा जुना टी–शर्ट, तुम्हाला माहीत आहे, आणि यासारखे लहान हात. आणि माझे कान शरमेने जळत होते, मी त्यांच्या मधून चालत वर गेलो. मी कधीही मायक्रोफोनच्या आसपास ही गेलो नव्हतो.

81 आणि म्हणून मला तेथे प्रचार करावा लागणार होता, आणि मी एक विषय घेतला, मी तो कधीही विसरणार नाही, "श्रीमंत मनुष्याने त्याची दृष्टी नरकाकडे वर लावली आणि मग त्याने आरोळी मारली." मी, बऱ्याच वेळा, अशा तीन लहान गोष्टींचा प्रचार करतो, "या, एक मनुष्य पहा," "यावर तुमचा विश्वास आहे का?" किंवा "मग त्याने आरोळी मारली." आणि मी म्हणत राहिलो, "तेथे फुले नाहीत, आणि मग त्याने आरोळी मारली. तेथे कोणती ही प्रार्थना सभा नाही, मग त्याने आरोळी मारली. तेथे मुले नाहीत, मग त्याने आरोळी मारली. गाणी नाहीत, आणि मग त्याने आरोळी मारली." मग मी रडलो.

82 तर सगळं संपल्यावर, का, माझं, ते फक्त...ते सर्व माझ्या सभोवती, इच्छा करीत होते की मी त्यांच्यासाठी सभा घ्यावी. आणि मला वाटलं, "म्हणा, कदाचित मी एक देव वेडे आहे!" समजले? म्हणून मला वाटले, "कदाचित..." पहा, ते इतके चांगले लोक होते.

83 आणि मी तेथून बाहेर गेलो. काउबॉय बूट, आणि मोठी काउबॉय टोपी घातलेला एक माणूस, मी म्हणालो, "तू कोण आहेस?"

तो म्हणाला, "मी एल्डर *अमुक–आणि–अमुक* आहे टेक्सासहून आलो आहे."

मला वाटले, "बरं, ते दिसले..."

84 आणखी एक सहकारी या छोट्या छोट्या निकर–बॉकर पँटसह चालात आला, तुम्हाला माहिती आहे, ते त्यासह गोल्फ खेळायचे, आणि त्यातील एक छोटेसे जर्सी स्वेटर सह. तो म्हणाला, "मी फ्लोरिडा येथील रेव्ह. *अमुक–आणि–अमुक* आहे. तू येशील का..."

85 मला वाटले, "मी घरीच आहे, मुला, हे येथे सीर्सकर ट्राउझर्स आणि टी शर्ट आहेत. ते अगदी ठीक आहे."

86 तर, तुम्ही त्या गोष्टींवर माझी जीवनकथा ऐकली आहे, म्हणून मी इथे थांबेन आणि तुम्हाला असे काहीतरी सांगेन जे मी यापूर्वी कधीही सांगितले नाही. पहिली गोष्ट, मला तुम्हाला विचारायची आहे...मी ते गाळणार होतो. मी माझ्या आयुष्यात, सार्वजनिकरित्या असे कधीही सांगितले नाही. जर तुम्ही मला वचन देता की तुम्ही माझ्यावर प्रेम करता आणि मी हे म्हटल्यानंतर माझ्यावर तितकेच प्रेम करण्याचा प्रयत्न कराल जसे मी ते सांगण्यापूर्वी करत होता, तुमचा हात वर करा. ठीक आहे. हे तुझे वचन आहे, मी तुम्हाला ते धरून ठेवणार आहे.

87 त्या रात्री सभेत बसून, जेव्हा ते त्यांची गाणी म्हणत तेव्हा ते टाळ्या वाजवीत. आणि ते गातील, "मी..." ते छोटेसे गाणे, "मला माहित आहे की ते रक्त होते. मला माहित आहे

की ते रक्त होते.” आणि ते गल्लीत सर्व वर आणि खाली धावतील, आणि सर्व काही, फक्त आरोळी मारीत आणि परमेश्वराची स्तुती करीत. मला वाटते, “ते मला भयंकर चांगले वाटते.” मी सुरुवात करतो...

88 आणि ते सर्व समयी प्रेषितांची कृत्ये 2:4, प्रेषितांची कृत्ये 2:38, कृत्ये 10:49, या सर्व गोष्टींचा संदर्भ देत होते. मला वाटले, “म्हणा, ते पवित्र वचन आहे! मी ह्या आधी असे कधीच पाहिले नव्हते.” पण, अरे, माझे हृदय जळत होते, विचार केला, “हे अद्भुत आहे!” जेव्हा मी त्यांना पहिल्यांदा भेटलो तेव्हा मला वाटले की तो देव वेडा समुह आहे, आणि मला वाटले, “अरे, देवा! आता ते देवदूतांचा एक समुह आहे.” बघा, मी पटकन माझा विचार बदलला.

89 म्हणून दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा परमेश्वराने मला या सभा घेण्याची ही मोठी संधी दिली होती, मला वाटले, “अरे, माझ्या, मी या लोकांच्या समुहासह मिळेन! ह्याचमुळे त्यांना त्या प्रकारचे नाव मिळाले असावे ‘आरोळी मारणारे मेथडिस्ट.’ जरा दूर गेलो,” मला वाटले. “कदाचित तेच असतील.” म्हणून मला वाटले, “बरं, मी आहे...मला ते नक्कीच आवडेल. अरे, मला त्यांच्याबद्दल काहीतरी आवडते, ते नम्र आणि गोड आहेत.”

90 तर एक गोष्ट मला समजू शकली नाही ती म्हणजे अन्य भाषेत बोलणे, ते मला समजले. मी आणि...तेथे एक मनुष्य, *येथे* बसला होता आणि *येथे* एक आहे, आणि ते समुहाचे नेते होते. *हा* उठेल आणि अन्य भाषेत बोलेल, *हा* त्याचा अर्थ सांगेल आणि सभेविषयी गोष्टी सांगेल आणि अशा प्रकारे. मला वाटले, “बाप रे, अरे, मला ते वाचावे लागेल!” तर मग ते उलट होईल, *यावर* पडतील आणि नंतर त्याकडे परत जातील; आणि प्रत्येकजण निरनिराळ्या भाषेत बोलेल, अर्थ सांगेल. बाकीची मंडळी बोलेल, पण या दोन मनुष्यासारखा अर्थ लावला जाईल असे वाटले नाही. आता, मी त्यांना जवळ बसलेले पाहिले, मला वाटले, “अरे, देवा, ते देवदूत असावेत!” तर मागे तेथे बसलो असताना...

91 जे काही होते (तुम्हाला माहित आहे) ते मी करू शकलो नाही, ते माझ्यावर येई. आणि माझ्याकडे गोष्टी जाणून घेण्याचा एक मार्ग आहे जर परमेश्वराची इच्छा आहे की मी ते जाणून घ्यावे, तुम्हाला माहिती आहे. आणि मी नाही...म्हणूनच मी म्हणतो की मी हे बोलत नाही, सार्वजनिक ठिकाणी यापूर्वी कधीही नाही. जर मला खरोखर काही शोधायचे असेल, प्रभु मला या गोष्टींबद्दल सांगतो. ह्यासाठीच कृपादान आहे, तुम्हाला समजले. त्यामुळे तुम्ही ते लोकांसमोर फेकून देऊ शकत नाही, तर ते तुमचे मोती डुकरांसमोर टाकण्यासारखे आहे. ही एक पवित्र, पवित्र गोष्ट आहे, आणि तुम्हाला ती करायची इच्छा नाही. तर, देव मला जबाबदार धरेल. बंधूंशी बोलणे आणि त्यासारखे, मी भावाविषयी काहीतरी वाईट शोधण्याचा प्रयत्न करणार नाही.

92 एकदा एका व्यक्ती सोबत टेबलावर बसलेलो असता, त्याचे हात माझ्याभोवती ठेवून म्हणाला, “ओ बंधु ब्रॅन्हम, मी तुझ्यावर प्रेम करतो.” आणि मला काहीतरी हालचाल जाणवत राहिली. मी त्याच्याकडे पाहिले. तो मला ते सांगू शकला नसता; मला माहित आहे की त्याने ते केले नाही, पहा, कारण ते तेथे होते. तो पूर्णपणे ढोंगी होता, जर कोणी असेल तर पहा, आणि तेथेच माझ्याभोवती हात ठेवून.

93 मी म्हणालो, “बरं, ठीक आहे,” निघून गेला. मला ते जाणून घ्यायचे नाही. माझा भाऊ म्हणून, मी त्याला ज्या प्रकारे ओळखतो त्याच प्रकारे मी त्याला ओळखू इच्छितो, आणि ते असेच असू द्या. बाकी देवाला करू द्या. पहा? आणि माझी इच्छा नाही की... माहित नाही, त्या गोष्टी जाणून घ्याव्या.

94 आणि या गोष्टींवर बऱ्याच वेळा, ते येथे चर्चमध्ये नाही. मी खोलीत बसलेला असेन, रेस्टॉरंटमध्ये असेन, आणि पवित्र आत्मा मला घडणाऱ्या गोष्टी सांगेल. येथे असलेल्या लोकांना हे माहित आहे की हे खरे आहे. मी माझ्या घरी बसेन आणि मी म्हणेन, “आता, काळजी घ्या, थोड्या वेळाने एक गाडी येत आहे. तो एक *विशिष्ट–विशिष्ट* व्यक्ती असेल. त्यांना आत आणा, कारण परमेश्वराने सांगितले आहे की ते येथे असतील.” “जेव्हा आपण रस्त्यावर जाऊ, तेथे *काही* गोष्टी घडतील. तेथे क्रॉसिंगवर पहा, कारण तुला जवळजवळ अपघात होणार आहे.” आणि पहा, ते तसेच नाही का घडले, प्रत्येक वेळी, अगदी तंतोतंतपणे! त्यामुळे तुम्ही स्वतःला त्यात जास्त टाकू इच्छित नाही, कारण तुम्ही… ते—ते आहे…तुम्ही ते वापरू शकता, ते एक देवाचे दान हे, पण तुम्ही त्यासोबत काय करता ते पाहावे लागेल. देव तुम्हाला जबाबदार धरील.

95 मोशेकडे पहा. मोशे हा देवाने–पाठवलेला मनुष्य होता. तुमचा त्यावर विश्वास आहे का? पूर्वनिश्चित, पूर्वनियुक्त आणि संदेष्टा बनवले होते! आणि देवाने त्याला तेथे पाठवले, म्हटले, “जा खडकाला आज्ञा कर,” त्यावर मारल्यानंतर. म्हटले, “जा खडकाला आज्ञा कर, आणि त्यांतून पाणी निघेल.”

96 पण मोशे, रागाने, तेथे गेला आणि खडकावर आपटले. पाणी आले नाही, त्याने ती पुन्हा आपटली, म्हणाला, “तुम्ही बंडखोरांनो! आम्ही तुमच्यासाठी या खडकांतून पाणी काढवयाचे का?”

97 तुम्ही पाहिले देवाने काय केले? पाणी आले, पण म्हटले, “मोशे, इथे वर ये.” तो त्याचा शेवट होता, पहा. तुम्हाला त्या गोष्टी पहाव्या लागतील, म्हणून तुम्ही…तुम्ही दैवी दानांचे काय करता.

98 जसे एक प्रचारक, एक चांगला जबरदस्त प्रचारक, आणि बाहेर निघतो आणि केवळ अर्पण आणि पैसा घेण्यासाठी प्रचार करतो, देव त्याला त्यासाठी जबाबदार धरील. ते बरोबर आहे. दैवी दानांचे तुम्ही काय करता ते तुम्हाला पाहावे लागेल. आणि, किंवा काही चर्चसाठी काही मोठी प्रतिष्ठा किंवा मोठे नाव मिळवण्याचा किंवा स्वतःसाठी मोठे नाव मिळवण्याचा प्रयत्न करता. मी त्याऐवजी दोन किंवा तीन रात्रीच्या सभा करीन आणि कुठेतरी त्या जोडीन, आणि नम्र राहीन, आणि खाली राहणे पसंत करीन. आणि मला काय म्हणायचे आहे ते तुम्हाला माहिती आहे. होय, श्रीमान, नेहमी तुमची जागा ठेवा जिथे देव तुमच्यावर हात ठेवू शकेल.

आता हे आतील जीवनात आहे, लक्षात ठेवा.

99 तर मग या दिवशी, मला वाटले, “बरं, मी वर जाणार आहे.” आणि मला त्या लोकांबद्दल इतकी भीती वाटली, मला वाटले, “मी त्या लोकांविषयी जाणून घेईन.” आणि सभा संपल्यानंतर मी बाहेर अंगणात त्यांची वाट पाहत राहिलो. मी आजूबाजूला पाहिले. मला त्यापैकी एक सापडला, मी म्हणालो, “श्रीमान, तुम्ही कसे आहात?”

100 तो म्हणाला, “तुम्ही कसे आहात!” म्हणाले, “आज सकाळी प्रचार करणारे तरुण प्रचारक तुम्हीच होता का?”

मी म्हणालो…तेव्हा मी तेवीस वर्षांचा होतो. मी म्हणालो, “होय, श्रीमान.”

आणि तो म्हणाला, “तुझे नाव काय होते?”

मी म्हणालो, “ब्रॅन्हम.” आणि मी म्हणालो, “तुमचे?”

101 आणि त्याने मला त्याचे नाव सांगितले. आणि मला वाटलं, “बरं, आता, मी फक्त त्याच्या आत्म्याशी संपर्क करू शकलो तर.” आणि तरीही ते काय करत होते हे माहित

नव्हते. आणि मी म्हणालो, “बरं, बोला, श्रीमान,” मी म्हणालो, “तुमच्याकडे असे काहीतरी आहे जे माझ्याकडे नाही.”

तो म्हणाला, “तुम्ही विश्वास ठेवला तेव्हा तुम्हाला पवित्र आत्मा मिळाला आहे का?”

मी म्हणालो, “बरं, मी एक बाप्टिस्ट आहे.”

102 तो म्हणाला, “पण तुम्ही विश्वास ठेवल्या नंतर तुम्हाला पवित्र आत्मा मिळाला आहे का?”

103 आणि मी म्हणालो, “बरं, बंधु, तुला काय म्हणायचं आहे?” मी म्हणालो, “मला—मला ते मिळाले नाही जे तुम्हा सर्वांकडे आहे, मला हे माहित आहे!” मी म्हणालो, “कारण तुमच्याकडे असे काहीतरी आहे जे सामर्थ्यवान आहे असे दिसते...”

म्हणाले, “तुम्ही कधी अन्य भाषेत बोलला आहात का?”

आणि मी म्हणालो, “नाही, महाशय.”

म्हणाले, “मी तुम्हाला लगेच सांगेन की तुम्हाला पवित्र आत्मा मिळाला नाही.”

104 आणि मी म्हणालो, “बरं, जर मी...जर तसे असेल तर पवित्र आत्मा मिळविण्यासाठी काय करावे लागेल, माझ्याकडे तो नाही.”

105 आणि म्हणून ते म्हणाले, “बरं, जर तु अन्य भाषेत बोलत नाहीस, तर तुला तो मिळालेला नाही.”

106 आणि त्याचं संभाषण तसंच ठेवत मी म्हणालो, “बरं, मला तो कुठे मिळेल?”

107 म्हणाले, “तेथल्या खोलीत जा आणि पवित्र आत्मा मिळविण्याचा प्रयत्न कर.”

108 आणि मी त्याला पाहतच राहिलो, तुम्हाला माहिती आहे. मी काय करतोय हे त्याला कळत नव्हते, पण तो...मला कळले की त्याच्याकडे जरा विचित्र भावना आहे, कारण तो...माझ्याकडे पाहताच त्याचे डोळे थोडे चमकदार होऊ लागले. आणि तो...पण तो खरोखर ख्रिस्ती होता. तो पूर्णपणे, शंभर टक्के, ख्रिस्ती होता. ते बरोबर आहे. बरं, मला वाटलं, “देवाची स्तुती होवो, हे येथे आहे! मला—मला—मला कुठेतरी त्या वेदीवर जावे लागेल.”

109 मी बाहेर गेलो, आजूबाजूला पाहिले, मला वाटले, “मी दुसऱ्या मनुष्याला शोधतो.” आणि जेव्हा मी त्याला शोधले आणि त्याच्याशी बोलू लागलो, मी म्हणालो, “श्रीमान, तुम्ही कसे आहात?”

110 तो म्हणाला, “सांगा, तुम्ही कोणत्या चर्चचे आहात?” तो म्हणाला, “त्यांनी मला सांगितले की तू बाप्टिस्ट आहेस.”

मी म्हणालो, “होय.”

आणि तो म्हणाला, “तुला अजून पवित्र आत्मा मिळालेला नाही, तुम्हाला मिळाला हे का?”

मी म्हणालो, “बरं, मला माहित नाही.”

म्हणाले, “तु कधी अन्य भाषेत बोलला आहेस?”

मी म्हटले, “नाही, श्रीमान.”

म्हणाले, “तुला तो मिळालेला नाही.”

111 आणि मी म्हणालो, "बरं, मला माहित आहे की तुम्हा सर्वांना जे मिळाले ते माझ्याकडे नाही. ते मला माहीत आहे." आणि मी म्हणालो, "पण, माझ्या भावा, मला तो खरोखर हवा आहे."

तो म्हणाला, "बरं, तेथे आहे—तेथे तलाव तयार आहे."

112 मी म्हणालो, "माझा बाप्तिस्मा झालेला आहे. परंतु," मी म्हणालो, "मला—मला ते मिळालेले नाही जे तुम्हा सर्वांकडे आहे." मी म्हणालो, "तुमच्याकडे काहीतरी आहे जे मी—मला खरोखर हवे आहे."

आणि तो म्हणाला, "बरं, ते ठीक आहे."

113 मी त्याला पकडण्याचा प्रयत्न करत होतो, तुम्ही बघा. आणि जर मी...जेव्हा मला शेवटी त्याचा आत्मा मिळाला, तेव्हा आता, तो दुसरा मनुष्य होता, मी कधी खालच्या-पातळीच्या ढोंगी माणसाशी बोललो असेल, तर तो त्यातला एक होता. तो जगत होता... त्याची पत्नी कृष्ण-वर्णीय स्त्री होती, तो एक गोऱ्या स्त्री सोबत राहत होता आणि त्याला तिच्यापासून दोन मुले होती. दारू पिणे, अपशब्द बोलणे, खानावळीकडे धावणे, आणि इतर सर्व काही, आणि तरीही तेथे आणि निरनिराळ्या भाषेत बोलत आणि भविष्यवाणी करीत होता.

114 मग मी म्हणालो, "प्रभु, मला क्षमा कर." मी घरी गेलो. ते बरोबर आहे. मी म्हणालो, "मला फक्त मिळेल...मी ते समजू शकत नाही. असे दिसते की धन्य पवित्र आत्मा पडतो, आणि, त्या ढोंग्या वर." मी म्हणालो, "असू शकत नाही! एवढेच."

115 या प्रदीर्घ कालावधीत, मी अभ्यास करत होतो आणि रडत होतो, विचार केला की मी त्यांच्याबरोबर बाहेर पडू शकलो तर कदाचित मला हे सर्व काय आहे ते कळेल. येथे एक आहे, एक खरा ख्रिस्ती; आणि तो दुसरा, खरा ढोंगी. मग मला वाटलं, "त्याचं काय? अरे," मी म्हणालो, "देवा, कदाचित—कदाचित माझ्यामध्ये काहीतरी चूक आहे." आणि मी म्हटले, एक कट्टरतावादी असल्याने, "ते...बायबलमध्ये ते पहावे लागेल. ते करावे लागेल."

116 माझ्यासाठी, जे काही चालते ते या बायबलमधून बाहेर आले पाहिजे अन्यथा ते सत्य नाही. ते येथून आले पाहिजे. ते बायबलमध्ये सिद्ध केले जाऊ शकते, केवळ एका ठिकाणीच नव्हे, परंतु ते सर्व बायबलमधून आले पाहिजे. मला त्यावर विश्वास ठेवावा लागेल. ते प्रत्येक शास्त्रासोबत जोडले जाणे आवश्यक आहे अन्यथा मी त्यावर विश्वास ठेवीत नाही. आणि मग, कारण पौलाने म्हटले, "जर स्वर्गातून एखादा देवदूत आला, अन्य सुवार्तेचा प्रचार करु लागला, तर तो शापित होवो." म्हणून मी बायबलवर विश्वास ठेवतो.

आणि मी म्हणालो, "मी बायबलमध्ये असे काहीही पाहू शकलो नाही."

117 दोन वर्षांनंतर, मी माझी पत्नी आणि सर्वकाही गमावल्यानंतर, मी तेथे ग्रीन्स मिलमध्ये, माझी छोटीशी पूर्वीची जागा, प्रार्थना करीत होतो. माझ्या गुहेत परत गेले दोन-तीन दिवस, दोन दिवस होतो. थोडा श्वास घेण्यासाठी, हवेत श्वास घेण्यासाठी मी बाहेर पडलो. आणि जेव्हा मी तेथून बाहेर पडलो, माझे बायबल ओंडक्याच्या शेवटी ठेवले होते जेव्हा तुम्ही आत येता तसे. एक जुने झाड उन्मळून पडले होते, त्यात काटा होता. आता, तु...*असा* एक काटा उभा होता, आणि झाड खाली पडले होते. आणि मी नुकतेच त्या ओंडक्याला वळसा घालून बसलो, आणि रात्रीच्या वेळी तिथेच पडून राहिलो, अशा प्रकारे आकाशाकडे बघत, माझा हात *असा* वर ठेवलेला होता, आणि कधी कधी तसाच प्रार्थना करीत, ओंडक्यावर टेकून झोपी जात होतो. तेथे बरेच दिवस

होतो, काही खात किंवा पित नव्हतो, फक्त तेथे प्रार्थना करीत. आणि मी त्या गुहेतून, थोडी ताजी हवा घेण्यासाठी बाहेर पडलो; तेथे फार थंडावा, ओलावा होता.

118 मग मी बाहेर आलो आणि आदल्या दिवशी जेथे माझे बायबल ठेवले होते तेथे ठेवले, आणि ते इब्री, 6व्या अध्यायाकडे उघडलेले होते. आणि मी तेथे वाचू लागलो, "आपण बाजूला ठेवूया...वर...प्रौढतेकडे जाऊ या, पश्चात्ताप आणि निर्जीव कृत्ये आणि देवावरील विश्वास हा पाया पुन्हा न घालता," आणि पुढे. "कारण त्यांच्यासाठी हे अशक्य आहे ज्यांना एकदा प्रकाश मिळाला, ज्यांनी स्वर्गीय दानाची रुची घेतली, आणि जे पवित्र आत्म्याचे वाटेकरी झाले," आणि पुढे. पण म्हटले, "पण जी काटेकुसळे उपजविते ती नापसंत आणि शापित आहे, ज्याचा शेवट...पाणी...जी भूमी वारंवार पडलेला पाऊस पिऊन आपली लागवड येतो आणि ते तयार करतो जे आहे त्यासाठी—ती नापसंत आणि शापित आहे, जी काटेकुसळे उपजविते, तिचा शेवट जाळण्यात आहे."

आणि काहीतरी गेले, "हूश"

119 मला वाटले, "येथे तो आहे. मी आता ऐकेन तो जे काही...त्याने मला येथे जागे केले, तो आता मला दृष्टान्त देण्याचे ठरवत आहे." मी त्या ओंडक्याच्या शेवटी तेथे थांबलो, आणि वाट पाहत होतो. मी उठलो आणि मागे व पुढे, वर आणि खाली चाललो. परत फिरलो, काही घडले नाही. पुन्हा माझ्या गुहेत परत गेलो, काहीही घडले नाही. मी तेथे उभा राहिलो, मला वाटले, "बरं, हे काय आहे?"

120 मी पुन्हा माझ्या बायबलकडे गेलो, आणि, अरे, ते माझ्यापुढे पुन्हा आले. मी ते उचलले, आणि मला वाटले, "तेथे काय आहे जे मी वाचावे अशी त्याची इच्छा आहे?" मी खाली ह्या विषयावर वाचत राहिलो "देवाकडे पश्चात्ताप, आणि विश्वास," आणि पुढे, आणि मी खाली वाचले जेथे ते म्हणते, "पाऊस भूमीवर वारंवार पडतो ह्यासाठी की तिला सजवावे आणि ज्या साठी तिला बनविले आहे त्याकरिता तिला तयार करावे, कारण, पण जी काटे आणि कुसळे उपजविते ती नापसंत व शापित होण्याच्या बेतात आलेली आहे तिचा शेवट जाळण्यात आहे." आणि, अरे, ते मला हादरवून टाकेल!

121 आणि मला वाटले, "प्रभु, तू मला दृष्टान्त देणार आहेस का..." मी त्याच्याकडे दुसरे काहीतरी मागण्यासाठी तेथे होतो.

122 मग एकाच वेळी, माझ्यासमोर, मी जग फिरताना पाहिले, आणि ते सर्व चकटीसारखे वर गेले. आणि येथे पांढरे वस्त्र घातलेला एक मनुष्य, त्याचे डोके वर करून, अशा प्रकारे बिया पेरीत गेला. आणि जेव्हा तो गेला, आला, जसा तो टेकडीवर गेला, त्याच्या मागे एक मनुष्य, काळे वस्त्र घातलेला, त्याचे डोके खाली ठेवून, बिया पेरीत आला. आणि जेव्हा चांगले बियाणे वर आले, तेव्हा ते गहू होते; आणि जेव्हा वाईट बिया वर आले, तेव्हा ते निदण होते.

123 आणि मग पृथ्वीवर मोठा दुष्काळ पडतो, आणि गव्हाचे दाणे लटकत होते, नष्ट होण्याच्या बेतात होते, त्यांना पाण्याची गरज होती. आणि मी सर्व लोकांना हात वर करून, देवाला पाणी पाठवण्याची प्रार्थना करताना पाहिले. आणि मग मी निदण पाहिले, तेही खाली वाकले होते, पाण्यासाठी वाकले होते. आणि तेवढ्यात मोठे ढग समोर येतात आणि मुसळधार पाऊस पडतो. आणि जेव्हा तो पडला, सर्व वाकलेला छोटा गहू, "व्हिश," लगेच उभा राहिला. आणि त्याच्या बाजूचे छोटे निदण, "व्हिश," लगेच उभे राहिले.

मी विचार केला, "बरं, ते काय आहे?"

124 मग ते मला समजले. हे ते आहे. तोच पाऊस जो गहू वाढवितो, तोच निदणाला ही वाढवितो. आणि तोच पवित्र आत्मा लोकांच्या समुहावर पडू शकतो, आणि ढोंगी मनुष्याला आशीर्वाद देऊ शकतो जसा तो दुसऱ्याला आशीर्वाद देतो. येशूने म्हटले, "त्यांच्या फळांवरून तुम्ही त्यांना ओळखाल." तो ओरडतो त्यावरून नाही, आनंद करतो की नाही, पण "त्याच्या फळावरून तुम्ही त्याला ओळखाल."

125 मी म्हणालो, "तिकडे तू आहेस!" "मला समजले, प्रभु." मी म्हणालो, "तर मग तेच खरे सत्य आहे." हा मनुष्य…देवाची ओळख नसताही तुम्हाला कृपादाने मिळू शकतात.

126 तर मग मी—मग मी अन्य भाषा बोलण्यावर खूप टीका करत होतो, तुम्ही पहा. पण एके दिवशी, नंतर, कसे देवाने मला ते प्रकट केले!

127 मी नदीवर बाप्तिस्मा देत होतो, माझा पहिला परिवर्तीत, ओहीयो नदीवर, आणि सतराव्या व्यक्तीला मी बाप्तिस्मा देत होतो, मी त्याला बाप्तिस्मा देऊ लागलो, मी म्हणालो, "पित्या, जसा मी त्याचा पाण्याने बाप्तिस्मा करतो, तू त्याला पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा दे." मी सुरुवात केली—त्याला पाण्याखाली बुडविण्यासाठी.

128 आणि तेवढ्यात वरून आकाशातून एक वावटळ आली, आणि तो प्रकाश खाली चमकत आला. जूनमध्ये, दुपारी दोन वाजता, काठावर शेकडो आणि शेकडो लोक. आणि मी जेथे होतो तेथेच वर तो टांगलेला होता. तेथून एक वाणी झाली, आणि म्हणाली, "जसा बाप्तिस्मा करणारा योहान ख्रिस्ताच्या पहिल्या आगमनाच्या आधी मार्ग सिद्ध करण्यास पाठवण्यात आला होता, तुमच्याकडे एक आहे…एक संदेश आहे जो ख्रिस्ताच्या दुसऱ्या आगमनासाठी मार्ग सिद्ध करील." आणि त्यामुळे मला मृत्यूचे भय आले.

129 आणि मी परत गेलो, आणि तिथले सर्व लोक, ते—ते कारखान्यात काम करणारे पुरुष आणि ते सर्व, व्यसनाधीन, आणि असे ते सर्व त्या किनाऱ्यावर. त्या दुपारी मी सुमारे दोन–तीनशे जणांना बाप्तिस्मा दिला होता. आणि जेव्हा त्यांनी मला बाहेर काढले, मला पाण्यातून बाहेर काढले, डिकन वगैरे वर गेले, त्यांनी मला विचारले, म्हणाले, "त्या प्रकाशाचा अर्थ काय होता?"

130 तो—तो गिल्ट एज बॅप्टिस्ट चर्च आणि लोन स्टार चर्च येथील कृष्ण वर्णीय लोकांचा एक मोठा गट, आणि त्यातले बरेच जण खाली होते, जेव्हा त्यांनी घडलेल्या गोष्टी पाहिल्या ते ओरडू लागले, लोक बेशुद्ध झाले.

131 एक मुलगी जिला मी बोटीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला, ती तेथे स्विमिंग सूट घालून बसली होती, एका चर्चमधील रविवारच्या शाळेतील शिक्षक, आणि मी म्हणालो, "तू बाहेर पडणार नाहीस, मार्गी?"

ती म्हणाली, "बिली, मला बाहेर पडण्याची गरज नाही."

132 मी म्हणालो, "ते बरोबर आहे, तुला याची गरज नाही, पण माझ्याकडे सुवार्तेबद्दल पुरेसा आदर आहे बाहेर पडण्यासाठी जेथे मी बाप्तिस्मा देत आहे."

ती म्हणाली, "मला तसे करण्याची गरज नाही."

133 आणि जेव्हा ती तेथे बसली होती, तेव्हा मला बाप्तिस्मा देताना पाहून हसत होती आणि हसत होती, कारण तिचा बाप्तिस्मा घेण्यावर विश्वास नव्हता, म्हणून मग जेव्हा प्रभूचा दूत खाली आला तेव्हा ती नावेत पुढे गेली. आज ती मुलगी वेड्यांच्या संस्थेत आहे. त्यामुळे तुम्ही देवाशी खेळू शकत नाही. पहा? आता, त्यानंतर…एक सुंदर मुलगी, नंतर मद्यपान करण्यासाठी गेली, तिला बाटलीने, बिअरच्या—च्या बाटलीने मारण्यात आले, तिचा चेहरा कापला गेला. अरे, एक भयानक दिसणारी व्यक्ती! आणि तेथेच ते घडलं.

134 आणि मग आयुष्यभर मी ते पाहत आलो, ते हलताना पहात, ते दृष्टान्त पहात, त्या गोष्टी कशा घडतील. मग, काही समयानंतर, त्याचा मला खूप त्रास होत गेला, आणि प्रत्येकजण मला सांगत होता की हे चुकीचे आहे. आणि मी माझ्या जुन्या स्टॉम्पिंग ग्राउंड्सकडे निघालो, जेथे मी नेहमी प्रार्थना करीत असे. आणि मी...ते माझ्याकडे येऊ नये म्हणून मी कितीही प्रार्थना करत राहिलो, तरी ते कसेही येत राहिले. आणि म्हणून मी फक्त होतो...मी होतो—मी इंडियाना राज्यात खेळांचा अधिकारी होतो. आणि मी आत आलो, तेथे एक मनुष्य बसला होता, जो माझ्या आराधनातील पियानोवादकाचा भाऊ होता. आणि तो म्हणाला, "बिली, आज दुपारी तू माझ्याबरोबर मॅडिसनला येशील का?"

मी म्हणालो, "मी ते करू शकत नाही, मला जंगलात जावे लागणार आहे."

135 आणि मी...फक्त घराकडे आलो आणि माझा पट्टा, बंदुकीचा पट्टा आणि वस्तू घेतल्या, आणि माझ्या शर्टाच्या बाह्या गुंडाळल्या. आम्ही एका छोट्याशा दोन खोल्यांच्या घरात राहत होतो, आणि मी हात-पाय धुवून जेवण तयार करणार होतो. आणि मी हात पाय धुतले होते, आणि फक्त घराच्या बाजूने फिरत होतो, एका—एका मोठया झाडाखाली, आणि एकाच वेळी काहीतरी गेले, "व्हूश्!" आणि अगदी जवळपास निघून गेले. आणि मी पाहिले, आणि मला कळले की ते पुन्हा तेच होते.

136 मी त्या पायऱ्यांवर बसलो, आणि तो त्याच्या गाडीतून उडी मारून माझ्याकडे धावला, म्हणाला, "बिली, तू घाबरला आहेस का?"

मी म्हटले, "नाही, श्रीमान."

तो म्हणाला, "काय झाले आहे, बिली?"

137 आणि मी म्हणालो, "मला माहीत नाही." मी म्हणालो, "पुढे जा, भाऊ, ते सर्व ठीक आहे. धन्यवाद."

138 माझी पत्नी बाहेर आली आणि पाण्याचा जग घेऊन आली, ती म्हणाली, "प्रिय, काय झालं आहे?"

मी म्हणालो, "काहीही नाही, प्रिये."

139 म्हणून ती म्हणाली, "चला आता, जेवण तयार आहे," आणि तिने तिचा हात माझ्याभोवती ठेवला, मला आत आणण्याचा प्रयत्न केला.

140 मी म्हणालो, "प्रिये, मला—मला तुला काहीतरी सांगायचे आहे." मी म्हणालो, "तु त्यांना फोन कर आणि सांग की मी आज दुपारी बाहेर जाणार नाही." मी म्हणालो, "मेडा, प्रिये," मी म्हणालो, "मला माहीत आहे की मी माझ्या अंत: करणापासून येशू ख्रिस्तावर प्रेम करतो. मला माहित आहे की मी मरणातून जीवनात गेलो आहे. पण सैतानाचा माझ्याशी काही संबंध असावा असे मला वाटत नाही." आणि मी म्हणालो, "मी असे पुढे जाऊ शकत नाही; मी एक बंदिवान आहे." मी म्हणालो, "सर्व समयी, जेव्हा ही गोष्ट घडत राहते, अशा गोष्टी, आणि हे दृष्टान्त येत असतात, आणि असेच पुढे. किंवा, ते काहीही असो," मी म्हणालो, "ते मजबरोबर घडते." मला माहित नव्हते की तो एक दृष्टान्त आहे. मी याला दृष्टान्त म्हटले नाही. मी म्हणालो, "ती एक प्रकारची गाढ तंद्री सारखी," मी म्हणालो, "ते काय आहे हे मला माहीत नाही. आणि, प्रिये, मी—मी—मला—मला यात फसवणूक करायची नाही, ते—ते मला सांगतात की हे भूत आहे. आणि माझे प्रभु येशूवर प्रेम आहे."

141 "अरे," ती म्हणाली, "बिली, लोक तुम्हाला काय सांगतात ते तुम्ही ऐकू नये."

142 मी म्हणालो, “पण, प्रिये, इतर प्रचारकांकडे पहा.” मी म्हणालो, “मला—मला ते नको आहे.” मी म्हणालो, “मी जंगलात माझ्या जागेवर जात आहे. माझ्याकडे अंदाजे पंधरा डॉलर्स आहेत, तु बिलीची काळजी घे.” बिली तेव्हा एक लहान मुलगा होता, एक लहान मुलगा. मी म्हणालो, “आपण—तू घे...ते तु आणि बिलीसाठी काही काळ, जगण्यासाठी पुरेसे आहेत. त्यांना संपर्क कर आणि सांग मी—मी उद्या परत येईन, आणि कदाचित मी कधीच परत येणार नाही. जर मी पुढील पाच दिवसात परतलो नाही, तर माझ्या जागी एक मनुष्य ठेवा.” आणि मी म्हणालो, “मेडा, मी त्या जंगलातून कधीच बाहेर येणार नाही जोपर्यंत देव मला वचन देत नाही की तो माझ्यापासून ती गोष्ट काढून घेईल आणि पुन्हा कधीही होऊ देणार नाही.” अज्ञानाचा विचार कर की जे मनुष्याकडे असू शकते!

143 आणि मी त्या रात्री तेथे गेलो. त्या जुन्या खोलीत परत गेलो, दुसरा दिवस उजाडण्यापूर्वी; तो पर्यन्त उशीर झाला होता. मी दुसऱ्या दिवशी, वर माझ्या कॅम्पला जाणार होतो...डोंगराभोवती, किंवा टेकडीवर, त्याऐवजी, आणि तिथल्या जंगलात जाणार होतो. माझा एफ.बी.आई. वर विश्वास नाही ते मला तिथे शोधू शकतील. तर ही छोटीशी जुनी खोली...मी संपूर्ण दुपारभर प्रार्थना करत होतो आणि अगदी अंधार पडण्यापुर्वी. मी प्रार्थना करीत होतो तेथे बायबलमध्ये वाचत होतो जेथे ते म्हणते, “संदेष्ट्यांचा आत्मा संदेष्ट्याच्या स्वाधीन आहे.” मी ते समजू शकलो नाही. त्यामुळे त्या जुन्या खोलीमध्ये खूप अंधार झाला होता.

144 जेथे मी लहानपणी जाळे मांडायचो, तेथून एक जाळ्याची रांग होती, आणि तेथे जाऊन मासे धरीत असे आणि रात्रभर राहात असे. तेथे असलेली एक लहानशी जुनी जीर्ण खोली, खूप वर्षांपासून तेथे होती. ह्यापुर्वी काही भाडेकरूने ती घेतली असावी.

145 आणि म्हणून मी—मी तिथेच थांबलो होतो. आणि मला वाटलं, “ठीक आहे.” एक वाजले, दोन वाजले, पहाटे तीन वाजले, मी वर खाली मजल्यावर चालत होतो, पुढे मागे चालत होतो. मी तिथल्या एका जुन्या स्टूलवर बसलो...स्टूल नाही, कसलातरी एक छोटासा जुना बॉक्स. आणि मी तिथे बसलो आणि मला वाटले, “हे देवा, तू माझ्याशी असे का करतोस?” मी म्हणालो, “पित्या, तुला माहीत आहे मी तुझ्यावर प्रेम करतो. तुला माहित आहे की माझं तुझ्यावर प्रेम आहे! आणि माझी—माझी—माझी इच्छा नाही की मजवर सैतानाचा ताबा असावा. माझी इच्छा नाही की त्या गोष्टी माझ्या बाबतीत घडाव्या. कृपया देवा, यापुढे असे कधीही होऊ देऊ नकोस.”

146 मी म्हणालो, “मी—मी तुझ्यावर प्रेम करतो. मला नरकात जायचे नाही. जर मी चुकीचा असल्यास, मी उपदेश करून आणि प्रयत्न करून, आणि माझे प्रयत्न पुढे करून काय उपयोग? आणि मी फक्त स्वतःला नरकात नेत नाही, तर इतर हजारो लोकांची दिशाभूल करीत आहे.” किंवा, इतर शेकडो लोकांची, त्यांच्या दिवसात. आणि मी म्हणालो...माझ्याकडे एक मोठी सेवकाई आहे. आणि मी म्हटले, “बरं, मला—मला हे माझ्यासोबत पुन्हा कधीही घडू नये असे वाटते.”

147 आणि मी या छोट्या स्टूलवर बसलो. आणि मी फक्त बसलो आहे, अरे, या स्थितीत, अगदी *तसाच*. आणि, एकाच वेळी, मला खोलीत एक अती मंद प्रकाश दिसला. आणि मला वाटले कोणीतरी टॉर्च घेऊन येत आहे. आणि मी आजूबाजूला पाहिले, आणि मला वाटले, “बरे...” आणि येथे ते, अगदी माझ्या समोर होते. आणि मजल्यावरील जुन्या लाकडी फळीवर. आणि ते तेथे, अगदी माझ्या समोरच होते. कोपऱ्यात एक छोटासा जुना ड्रम स्टोव्ह ठेवलेला आहे, त्याच्या वरचा भाग फाटलेला होता. आणि—आणि अगदी

*येथेच* तेथे जमिनीवर एक—एक प्रकाश होता, आणि मला वाटले, “बरं, तो कुठे आहे? बरं, तो येऊ शकत नाही...”

148 मी आजूबाजूला पाहिले. आणि येथे तो माझ्यावर होता, *हा* तोच प्रकाश, जो तेथे माझ्यावर, *अशा* प्रकारे टांगलेला होता. अग्नीप्रमाणे सभोवती वर्तुळाकार होता, हा एक प्रकारचा हिरव्या पाचू रंगाचा आहे, जात होता, “व्हूश, व्हूश, व्हूश!” असा आवाज करीत, अगदी त्याच्या वर, अशा प्रकारे. आणि मी त्याकडे पाहिले. मला वाटले, “ते काय आहे?” आता, मला त्याची भीती वाटली.

149 मी कोणीतरी येताना ऐकले, [बंधू ब्रॅन्हम उदाहरण देतात—संपा.] अगदी, चालत आला, तो अनवाणी होता. आणि मला मनुष्याचा पाय आत येताना दिसला. तेथे खोलीत अंधार होता, पण नेमका येथेच खाली चमकत होता. आणि मला एका मनुष्याचा पाय आत येताना दिसला. आणि जेव्हा तो खोलीत आला, वर गेला, तो एक मनुष्य होता सुमारे...दोनशे पौंड वजनाचा दिसत होता. त्याने *असे* हात जोडलेले होते. आता, मी ते एका वावटळीत पाहिले होते, मी ते माझ्याशी बोलताना ऐकले होते, आणि ते प्रकाशाच्या रूपात पाहिले होते, परंतु मी त्याची प्रतिमा प्रथमच पाहिली. तो माझ्याकडे चालत आला, अगदी जवळ.

150 बरं, प्रामाणिक मित्रांनो, मला—मला वाटले माझे हृदय बंद होईल. मी...फक्त कल्पना करा! स्वतःला तेथे ठेवा, तुम्हालाही असेच वाटेल. तुम्ही कदाचित माझ्यापेक्षा जास्त काळापासून ह्या मार्गावर असाल, कदाचित जास्त काळापासून ख्रिस्ती असाल, परंतु यामुळे तुम्हाला तसेच वाटेल. कारण शेकडो आणि शेकडो वेळा भेटीनंतर, जेव्हा तो जवळ आला, तेव्हा त्याने मला दुर्बल केले. हे कधी कधी मला आताही बनवते...मी जवळजवळ पूर्णपणे अर्धमेला होतो, अगदी इतका दुर्बल जेव्हा मी कित्येक वेळा व्यासपीठ सोडतो तितका. जर मी जास्त वेळ राहिलो, तर मी पूर्णपणे थकून जाईन. मी त्यांना तासन्तास भोवती फिरविले आहे, मी कुठे होतो हे देखील माहित नव्हते. आणि मी ते स्पष्ट करू शकत नाही. येथे बायबलमध्ये वाचा, आणि ते स्पष्ट करेल, ते काय आहे. पवित्र शास्त्र असे म्हणते!

151 म्हणून मी तिथेच बसून त्याच्याकडे बघत होतो. मी—मी *तसाच* माझा हात वर केला होता. तो माझ्याकडे पहात होता, तसाच आनंददायी. पण त्याचा आवाज खरा गंभीर होता, आणि तो म्हणाला, “घाबरू नकोस, मला सर्वशक्तिमान देवाच्या उपस्थितीतून पाठवले आहे.” आणि जेव्हा तो बोलला, तो आवाज, तोच आवाज माझ्याशी बोलला होता, जेव्हा मी दोन वर्षांचा होतो, अशा प्रकारे नेहमी. तो तोच होता हे मला माहीत होतं. आणि मला वाटलं, “आता...”

152 आणि तो ऐकला. आता ते संभाषण लक्षपूर्वक ऐका. मी त्याचा होईल तितके, अर्थपूर्ण दृष्टीने, शब्दशः, उल्लेख करेन, कारण मला महतप्रयासाने आठवत असेल.

153 तो...मी म्हणालो...असे त्याच्याकडे पाहिले. तो म्हणाला, “घाबरू नकोस,” अगदी शांतपणे, म्हणाला, “मला सर्वशक्तिमान देवाच्या उपस्थितीतून पाठवले आहे, तुला सांगण्यासाठी की तुझा विशेष जन्म...” माझा जन्म कसा झाला हे तुम्हाला माहीत आहे. जेव्हा माझा जन्म झाला तेव्हा हाच प्रकाश माझ्यावर टांगलेला होता. आणि म्हणून तो म्हणाला, “तुझा विशेष जन्म आणि न उलगडणारे जीवन हे सूचित करण्यासाठी आहे की तुला संपूर्ण जगात जायचे आहे आणि आजारी लोकांसाठी प्रार्थना करायची आहे.” आणि म्हणाला, “आणि त्यांच्याकडे काय आहे याची पर्वा न करता...” आणि त्याने नियुक्त केले आहे. देव, जो माझा न्यायाधीश आहे, जाणतो. की, त्याने नियुक्त केले आहे

"कर्करोग." म्हटले, "काहीही नाही...जर तु लोकांना तुझ्या विश्वासात घेतले, आणि तु प्रार्थना करताना प्रामाणिक असला, तुझ्या प्रार्थनेपुढे काहीही उभे राहणार नाही, अगदी कर्करोगही नाही." पहा, "जर तु लोकांना तुझ्या विश्वासात घेतले तर."

154 आणि मी पाहिले की तो माझा शत्रू नव्हता, तो माझा मित्र होता. आणि मला कळत नव्हते की—की मी मरत होतो किंवा काय घडत होते जेव्हा तो माझ्याकडे अशा प्रकारे येत असे. आणि मी म्हणालो, "बरं, श्रीमान," मी म्हणालो, "मी आहे..." मला आरोग्य आणि त्यासारख्या गोष्टी, त्या कृपदानांबद्दल काय माहित होते? मी म्हणालो, "बरं, श्रीमान, मी एक...मी—मी एक गरीब मनुष्य आहे." आणि मी म्हणालो, "मी माझ्या लोकांमध्ये आहे. मी—मी माझ्या गरीब लोकांसोबत राहतो. मी अशिक्षित आहे." आणि मी म्हणालो, "आणि मी—मी—मी करू शकणार नाही, ते करणार नाहीत—ते मला समजणार नाही." मी म्हणालो, "ते—ते करणार नाहीत—ते माझे ऐकणार नाहीत."

155 आणि तो म्हणाला, "जसे संदेष्टा मोशेला दोन कृपादाने, चिन्हे देण्यात आली होती," अधिक खरे म्हणजे, "त्याच्या सेवकाईचे समर्थन करण्यासाठी, म्हणून तुला दोन देण्यात आली आहेत—तसेच तुला दोन दाने तुझी सेवकाई सिद्ध करण्यासाठी देण्यात आली आहेत." तो म्हणाला, "त्यापैकी एक अशी असेल की तु ज्या व्यक्तीसाठी प्रार्थना करणार आहेस त्या व्यक्तीचा हात घेशील, तुझ्या डाव्या हाताने आणि त्यांचा उजवा हात," आणि म्हणाला, "मग केवळ शांत उभा राहा, आणि ते होईल...तेथे एक शारीरिक परिणाम तुझ्या शरीरावर दिसेल." आणि म्हटले, "मग तु प्रार्थना कर. आणि जर तो निघून गेला, तर तो रोग लोकांमधून निघून गेला आहे. जर तो निघून गेला नाही तर, फक्त आशीर्वाद माग आणि निघून जा."

"बरं," मी म्हणालो, "सर, मला भीती वाटते की ते मला स्वीकारणार नाहीत."

156 तो म्हणाला, "आणि दुसरी गोष्ट ही असेल, जर त्यांनी ते ऐकले नाही, तर ते हे ऐकतील." म्हणाले, "मग असे होईल की तुला त्यांच्या हृदयातील रहस्य कळेल." म्हटले, "हे ते ऐकतील."

157 "बरं," मी म्हणालो, "श्रीमान, म्हणूनच मी आज रात्री येथे आहे. मला माझ्या पाळकांनी सांगितले आहे की ज्या गोष्टी माझ्याबरोबर घडत आहेत त्या चुकीच्या होत्या."

158 तो म्हणाला, "याच उद्देशाकरिता तुझा या जगात जन्म झाला आहे." (पहा, "कृपादाने आणि पाचारण ही पश्चात्तापाविना आहेत.") तो म्हणाला, "याच उद्देशाकरिता तुझा या जगात जन्म झाला."

159 आणि मी म्हणालो, "बरं, श्रीमान," मी म्हणालो, "की, माझ्या पाळकांनी मला सांगितले, की तो—तो दुष्ट आत्मा होता." आणि मी म्हणालो, "ते...म्हणूनच मी येथे प्रार्थना करीत आहे."

160 आणि त्याने मला उदाहरणादाखल ज्याचा उल्लेख केला ते येथे आहे. त्याने मला प्रभू येशूच्या पहिल्या येण्याविषयी सांगितले. आणि मी म्हणालो...

161 विचित्र गोष्ट होती, मित्रांनो...बरं, मी येथे एका मिनिटासाठी थांबेन, मागे जाईन. मला नेहमीपेक्षा कशाने जास्त भीती वाटली, प्रत्येक वेळी मी भविष्य सांगणाऱ्याला भेटलो, त्यांना समजे की काहीतरी घडले आहे. आणि ते फक्त होईल...त्याने मला जवळजवळ ठार मारले.

162 उदाहरणार्थ, एके दिवशी मी आणि माझे चुलत भाऊ एका—एका आनंदोत्सव मेळ्यातून जात होतो, आणि आम्ही केवळ लहान मुलं होतो, सोबत चालत होतो. तर त्या

एका तंबूत एक वयस्कर ज्योतिषी बसला होता, एक तरुण स्त्री, सुंदर दिसणारी तरुणी, ती तिथे बसली होती. आणि आम्ही सर्व जात होतो, चालत होतो. ती म्हणाली, “म्हणा, तू, एक मिनिट इकडे ये!” आणि आम्ही तिन्ही मुलं मागे फिरलो. आणि ती म्हणाली, “तु पट्टयाचे स्वेटर घातलेला.” तो मीच होतो.

163 आणि मी म्हणालो, “हो, बाई?” मला वाटले की कदाचित तिला मला कोक आणायला पाठवायचे होते, किंवा असे काहीतरी. आणि ती एक—एक तरुण स्त्री होती, कदाचित तिच्या विशितली, किंवा असेच काही, तेथे बसली होती. आणि मी तेथे गेलो, मी म्हणालो, “होय, बाई, मी तुमच्यासाठी काय करू शकतो?”

164 आणि ती म्हणाली, “काय, तुला माहीत आहे का की तेथे एक—एक प्रकाश तुझ्या मागे येतो? तुझा जन्म एका विशिष्ट चिन्हाखाली झाला होता.”

मी म्हणालो, “तुम्हाला काय म्हणायचे आहे?”

165 ती म्हणाली, “बरं, तुझा जन्म एका विशिष्ट चिन्हाखाली झाला होता. एक प्रकाश तुझ्या मागे असतो. तुझा जन्म एका दैवी पाचरणासाठी झाला होता.”

मी म्हणालो, “बाई, येथून दूर जा!”

166 मी पुढे जाऊ लागलो, कारण माझी आई मला नेहमी सांगायची की ह्या गोष्टी सैतानापासून आहेत. ती बरोबर होती. म्हणून मी…त्यामुळे मला भीती वाटली.

167 आणि एके दिवशी जेव्हा मी गेम वॉर्डन असताना, मी बसमध्ये जात होतो. आणि मी बसमध्ये चढलो. नेहमी आत्म्यांच्या अधीन असल्याचे भासले. मी तेथे उभा होतो, आणि हा प्रवाशी माझ्या मागे उभा होता. आणि मी गस्तीसाठी जात होतो, आणि मी हेनरीविले फॉरेस्ट्रीकडे जात होतो, बसमध्ये होतो. मला थोड विचित्र वाटत होतं. मी इकडे तिकडे पाहिलं, आणि तेथे एक—एक चांगले वस्त्र परिधान केलेली, भली मोठी धिप्पाड स्त्री बसलेली होती. ती म्हणाली, “आपण कसे आहात?”

म्हणाले, “आपण कसे आहात!”

168 मला वाटले ती फक्त एक स्त्री आहे, तुम्हाला माहिती आहे, बोलत आहे, म्हणून मी फक्त ठेवले…ती म्हणाली, “मला तुमच्याशी एक मिनिट बोलायचे आहे.”

मी म्हणालो, “हो, बाई?” मी मागे फिरलो.

ती म्हणाली, “तुमचा जन्म एका चिन्हाखाली झाला हे तुम्हाला माहीत आहे का?”

169 मला वाटले, “आणखी एक मजा करणारी महिला.” म्हणून मी फक्त बाहेर बघितले. आणि म्हणून मी एक शब्दही बोललो नाही, केवळ…

170 ती म्हणाली, “मी तुझ्याशी एक मिनिट बोलू शकते का?” मी फक्त गप्प…ती म्हणाली, “असे वागू नका.”

171 मी फक्त पुढे बघत राहिलो. मला वाटले, “ते सभ्यतेला अनुसरून नाही.”

ती म्हणाली, “मला तुमच्याशी काही क्षण बोलायचे आहे.”

172 मी फक्त वाट पाहत राहिलो, आणि मी तिच्याकडे लक्ष दिले नाही. मला थेट विचार केला, “मला वाटते की ती इतरांप्रमाणेच म्हणते की नाही ते मी पाहीन.” मी मागे वळलो, मला वाटले, “अरे, देवा! ते मला भीती वाटेल, मला माहीत आहे.” कारण, मला तसा विचार करायचा वीट येतो. वळलो.

173 ती म्हणाली, “कदाचित मी स्वतःबद्दल अधिक सांगावे.” ती म्हणाली, “मी ज्योतिष शास्त्रज्ञ आहे.”

मी म्हणालो, “मला वाटलं तू अशीच कोणीतरी आहेस.”

174 ती म्हणाली, “मी माझ्या मुलाला भेटण्यासाठी शिकागोला जात आहे जो एक बाप्टिस्ट सेवक आहे.”

मी म्हणालो, “होय, बाई.”

175 ती म्हणाली, “कोणी तुला कधी सांगितले की तुझा जन्म एका चिन्हाखाली झाला आहे?”

176 मी म्हणालो, “नाही, बाई.” मी तिला तेथे खोटे बोललो, पहा, आणि मी म्हणालो... तिला काय म्हणायचे होते ते फक्त पहायचे होते. आणि ती म्हणाली...मी म्हणालो, “नाही, बाई.”

आणि ती म्हणाली, “कोणीही नाही...सेवकांनी तुला कधी सांगितले नाही का?”

मी म्हणालो, “माझा सेवकांशी काहीही संबंध नाही.”

आणि ती म्हणाली, “उह–हह.”

आणि मी म्हणालो...ती—ती मला म्हणाली...मी म्हणालो, “ठीक आहे...”

177 ती म्हणाली, “जर तुझा जन्म नेमका केव्हा झाला हे मी तुला सांगितले, तर तू माझ्यावर विश्वास ठेवशील का?”

मी म्हणालो, “नाही, बाई.”

आणि ती म्हणाली, “बरं, तुझा जन्म कधी झाला हे मी सांगू शकते.”

मी म्हणालो, “माझा त्यावर विश्वास नाही.”

178 आणि ती म्हणाली, “तुझा जन्म 6 एप्रिल, 1909 रोजी, पहाटे पाच वाजता झाला होता.”

179 मी म्हणालो, “ते बरोबर आहे.” मी म्हणालो, “तुम्हाला ते कसे कळले?” मी म्हणालो, “हा खलाशी कधी जन्मला ते सांग.”

म्हणाली, “मी सांगू शकत नाही.”

आणि मी म्हणालो, “का? तुला कसे माहित?”

180 म्हणाली, “बघा, श्रीमान.” ती म्हणाली, जेव्हा ती आता या खगोलशास्त्राबद्दल बोलू लागली, आणि ती म्हणाली, “दर इतक्या वर्षांनी...” म्हणाली, “तुम्हाला आठवत असेल जेव्हा पहाटेचा तारा आला, ज्याने ज्ञानी पुरुषांना येशू ख्रिस्ताकडे नेले?”

181 आणि मी एकप्रकारे थांबलो, तुम्हाला माहिती आहे, मी म्हणालो, “बरं, मला धर्माबद्दल काहीच माहिती नाही.”

182 आणि ती म्हणाली, “बरं, तुम्ही ज्ञानी लोक येशूला भेटायला आले ह्याबद्दल ऐकलं असेल.”

मी म्हणालो, “होय.”

आणि ती म्हणाली, “बरं, ज्ञानी पुरुष कोण होता?”

“अरे,” मी म्हणालो, “ते फक्त ज्ञानी पुरुष होते, एवढे मला माहीत आहे.”

183 ती म्हणाली, “बरं, ज्ञानी पुरुष म्हणजे काय?” ती म्हणाली, “तीच गोष्ट जी मी आहे, एक ज्योतिषी, ‘खगोलतज्ञ’ ते त्यांना संबोधतात.” आणि ती म्हणाली, “तुला माहीत आहे, देव काहीही करण्यापूर्वी मध्ये—मध्ये पृथ्वीवर, तो नेहमी स्वर्गात, आणि नंतर पृथ्वीवर प्रगट करतो.”

आणि मी म्हणालो, “मला माहीत नाही.”

184 आणि ती म्हणाली, “बरे...” तिने दोन किंवा तीन, बोलावले दोन...तीन तारे, जसे मंगळ, गुरु आणि शुक्र. ते ते नव्हते, पण ती म्हणाली, “त्यांनी त्यांचे मार्ग ओलांडले आणि एकत्र आले आणि बनवले...” म्हणाले, “प्रभू येशूला भेटायला तीन ज्ञानी पुरुष आले होते, आणि एक हामच्या वंशातला, एक शेम, आणि दुसरा याफेद.” आणि म्हणाली, “जेव्हा ते बेथलेहेम येथे एकत्र भेटले, तेव्हा ते तीन तारे त्या पासून होते...पृथ्वीवरील प्रत्येक व्यक्ती,” म्हणाली, “त्यांचा ताऱ्यांशी काहीतरी संबंध आहे.” म्हणाली, “जेव्हा चंद्र निघून जातो आणि स्वर्गीय ग्रह निघून जातात तेव्हा तिथल्या त्या खलाशीला विचारा, भरती त्याच्याबरोबर जात नाही आणि आत येत नाही.”

मी म्हणालो, “मला ते विचारण्याची गरज नाही, मला ते माहित आहे.”

185 आणि ती म्हणाली, “बरं, तुमच्या जन्माचा तिथल्या ताऱ्यांशी काहीतरी संबंध आहे.”

आणि मी म्हणालो, “बरं, मला ते माहित नाही.”

186 आणि ती म्हणाली, “आता, हे तीन ज्ञानी पुरुष आले.” आणि म्हटले, “जेव्हा ते तीन तारे, तेव्हा ते...ते वेगवेगळ्या दिशांनी आले आणि ते बेथलेहेम येथे भेटले. आणि ते म्हणाले त्यांना सापडले आणि सल्लामसलत घेतली, आणि एक हाम, शेम आणि याफेथ यांच्या वंशातील होता, नोहाचे तीन पुत्र.” आणि ती म्हणाली, “मग त्यांनी येऊन प्रभू येशू ख्रिस्ताची उपासना केली.” आणि म्हणाली, “जेव्हा ते निघाले,” म्हटले, “त्यांनी भेटवस्तू आणल्या आणि त्याच्यापुढे ठेवल्या.”

187 आणि म्हणाली, “येशू ख्रिस्ताने त्याच्या सेवकाइत सांगितले की जेव्हा ही सुवार्ता सर्व जगाला (हाम, शेम, आणि याफेथचे लोक), सांगितली जाईल तेव्हा तो पुन्हा येईल.” आणि ती म्हणाली, “आता, ते ग्रह, स्वर्गीय ग्रह, जेव्हा ते फिरत असताना...” म्हणाली, “ते वेगळे झाले. तेव्हापासून ते पृथ्वीवर कधीच ज्ञात, नव्हते. परंतु” म्हणाली “दर इतक्या शंभर वर्षांनी, ते त्यांचे चक्र *अशा* प्रकारे पार करतात.” जर येथे खगोलशास्त्रज्ञ असता, ती कशाबद्दल बोलत होती हे तुम्हाला कळले असते. मला ते समजत नाही. म्हणून जेव्हा ती बोलत होती–...म्हणाली, “ते तसे पार करतात.” आणि म्हणाली, “आजतगायत मानवजातीला दिलेल्या सर्वात मोठया भेटवस्तूचा स्मरणोत्सव हा होता, जेव्हा देवाने त्याचा पुत्र दिला. जेव्हा हे ग्रह पुन्हा स्वतःला ओलांडतील, का,” म्हणाली, “तो पृथ्वीला आणखी एक भेट पाठवील.” आणि म्हणाली, “तुझा जन्म ते ओलंडण्याच्या समयी झाला होता.” आणि म्हणाली, “हेच कारण आहे ते मला माहीत होतं.”

188 बरं, मग मी म्हणालो, “बाई, प्रथम, माझा याबद्दल कशावरही विश्वास नाही. मी धार्मिक नाही, आणि मला त्याबद्दल आणखी काही ऐकायचे नाही!” निघून गेलो. आणि म्हणून मी तिला लवकरच थांबविले. म्हणून मी बाहेर निघालो.

189 आणि प्रत्येक वेळी कधीही...मला त्यांच्यापैकी एक भेटत असे, ते असेच होई. आणि मला वाटे, “ते दुष्टआत्मे असे का करतात?”

190 मग प्रचारक, म्हणत, "तो सैतान आहे! तो सैतान आहे!" त्यांनी मला विश्वास ठेवण्यास लावले.

191 आणि मग त्या रात्री तेथे जेव्हा मी...जेव्हा त्याने त्याचा उल्लेख केला, मी त्याला विचारले, मी म्हणालो, "बरं, ही सर्व माध्यमे आणि त्यासारख्या गोष्टी का आहेत, आणि ते सैतानाने पछाडलेले लोक, जे मला नेहमी सांगतात; आणि पाळक, माझे बंधूंजन, मला सांगतात की ते दुष्ट आत्म्यापासून आहे?"

192 आता तो काय म्हणाला ते ऐका, हा जो तेथे चित्रात लटकत आहे. त्याने म्हटले, "तेव्हा जसं होतं, तसंच आताही आहे." आणि तो मला संदर्भ देऊ लागला, की, "जेव्हा आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताची सेवकाई सुरू झाली, शास्त्री म्हणाले, 'तो बालजबूब, सैतान होता'; पण भुते म्हणाली, 'तो देवाचा पुत्र होता, इस्राएलचा एक पवित्र.' भुते...आणि पौल आणि बर्णबा जेव्हा तेथे प्रचार करीत होते तेव्हा त्यांच्याकडे पहा. शास्त्री म्हणाले, 'ही माणसे जगाची उलथापालथ करतात. ते वाईट आहेत, ते—ते सैतान आहेत.' आणि रस्त्यावरील एका लहान दैवप्रश्न करणारीने ओळखले की, पौल आणि बर्णबा हे देवाचे लोक आहेत, ती म्हणाली, 'ते देवाचे पुरुष आहेत जे आपल्याला जीवनाचा मार्ग सांगतात.'" ते बरोबर आहे का? "अध्यात्मवादी आणि ज्योतिषी, भूत-ग्रस्त लोक."

193 परंतु आपण धर्मशास्त्रावर इतके मुरत जातो की आपल्याला आत्म्याबद्दल काहीच कळत नाही. मला आशा आहे की यानंतर तुम्ही माझ्यावर प्रेम कराल. पण तेच ते आहे. मला म्हणायचे आहे पेन्टेकॉस्ट, सुद्धा! ते बरोबर आहे. फक्त ओरडणे आणि नाचणे याचा अर्थ असा नाही की तुम्हाला आत्म्याबद्दल सर्वकाही माहिती आहे.

194 हा वैयक्तिक संपर्क आहे, तोंडो तोंड, तुम्हाला त्याचीच आवश्यकता आहे. तशाच प्रकारचे चर्च परमेश्वर उभारू इच्छित आहे, ते बरोबर आहे, जेव्हा ते ऐक्यात आणि सामर्थ्यात, आत्म्याने एकत्र येतात.

195 आणि त्याने त्याचा संदर्भ दिला. आणि त्याने मला सांगितले की कसा त्या सेवकाईचा गैरसमज केला, आणि मला खात्री दिली की धर्मपदेशकांनी त्याचा गैरसमज केला होता. आणि जेव्हा त्याने मला हे सर्व सांगितले आणि कसे तो येशू...

196 मी म्हणालो, "बरं, याचं काय, या गोष्टी ज्या माझ्यासोबत घडतात?"

197 आणि, तुम्ही पहा, तो म्हणाला, "त्या बहुगुणीत होतील आणि अधिक मोठ्या आणि मोठ्या होत जातील." आणि त्याने मला संदर्भ देऊन, सांगितले की येशूने हे कसे केले; तो कसा आला आणि त्याच्याकडे असे सामर्थ्य होते जे अगोदरच गोष्टी जाणू शकते आणि विहिरीवरील स्त्रियांना सांगू शकते, आरोग्यदाता असल्याचा दावा केला नाही, पित्याने दाखवल्याप्रमाणे त्या गोष्टी केल्याचा दावा केला.

मी म्हणालो, "बरं, तो आत्मा कोणत्या प्रकारचा असेल?"

तो म्हणाला, "तो पवित्र आत्मा होता."

198 मग माझ्या आत काहीतरी घडले, मला जाणवले की मी ज्या गोष्टीकडे पाठ फिरवली तीच गोष्ट आहे ज्यासाठी देवाने मला येथे आणले. आणि मला समजले की, त्या परुशी लोकांप्रमाणेच त्यांनी माझ्यासाठी पवित्र शास्त्राचा चुकीचा अर्थ लावला होता. तेव्हापासून पुढे मी त्याला माझा स्वतःचा अर्थ लावला, की पवित्र आत्मा काय सांगत आहे.

मी त्याला सांगितलं, "मी जाईन."

तो म्हणाला, "मी तुझ्याबरोबर असेन."

199 आणि तो दूत पुन्हा त्या प्रकाशात गेला तो भोवती आणि भोवती, आणि भोवती आणि भोवती, आणि त्याच्या पायाभोवती अशा प्रकारे येऊ लागला, त्या प्रकाशात गेला आणि इमारतीच्या बाहेर गेला.

मी एक नवीन प्रकारचा व्यक्ति होऊन घरी गेलो.

200 चर्चमध्ये गेलो आणि लोकांना याबद्दल सांगितले. ती...रविवारची रात्र होती.

201 आणि बुधवारी रात्री त्यांनी एका महिलेला तेथे आणले, एका मेओसची परिचारिका जी कॅन्सरने मरत होती, काहीही नाही केवळ एक छाया. जेव्हा मी तिला पाहाण्यासाठी गेलो, तेव्हा आधी एक दृष्टान्त आला, तिला परत शुश्रूषा करताना दाखवले. आणि ती लुईव्हिलमधील यादीत आहे, "मरून अनेक वर्षे झाली." ती आता जेफरसनव्हिल येथे आहे, परिचारिका आहे, खूप वर्षांपासून परिचारिका आहे. कारण, मी तेथे वर पाहिले, आणि मला ते दर्शन दिसले. मी मागे वळलो, मी काय करत आहे हे कळतच नव्हते, तेथे उभा होतो, माझा थरकाप उडाला जेव्हा त्यांनी ते प्रकरण पहिल्यांदा आणले आणि ते तेथे ठेवले. आणि तिच्या आजूबाजूला परिचारिका आणि गोष्टी उभ्या होत्या, आणि तिला तेथेच ठेवलेले होते आणि तिचा चेहरा सर्व आत गेला होता आणि तिचे डोळे खालवले होते.

202 मार्गी मॉर्गन. जर तुम्हाला तिला लिहायचे असेल, तर ते 411 नोब्लोच अव्हेन्यू, जेफरसनविले, इंडियाना आहे. किंवा क्लार्क काउंटी हॉस्पिटल, जेफरसनविले, इंडियाना येथे लिहा. तिला तुम्हाला ती—ती साक्ष देऊ द्या.

203 मी तेथे खाली पाहिले. आणि तेथले ते पहिले प्रकरण, ते पहाण्यास बाहेर आलो, एक दृष्टान्त आला. मी त्या स्त्रीला पुन्हा शुश्रूषा करताना, चांगली, मजबूत आणि निरोगी फिरताना पाहिले. मी म्हणालो, "**प्रभू परमेश्वर असे म्हणतो**, 'तू जगशील आणि मरणार नाहीस!'"

204 तिचा नवरा, या जगाच्या गोष्टीत खूप गढलेला मनुष्य, माझ्याकडे *असे* बघत राहिला. मी म्हणालो, "श्रीमान, घाबरू नका! तुमची पत्नी जगेल."

205 त्याने मला बाहेर बोलावलं, म्हटले...दोन-तीन डॉक्टरांना बोलावून, म्हणाले, "तुम्ही त्यांना ओळखता?"

मी म्हणालो, "होय."

206 "का," म्हणाला, "मी त्याच्यासोबत गोल्फ खेळलो आहे. तो म्हणाला, 'कॅन्सर तिच्या आतड्यांभोवती गुंडाळला गेला होता, तुम्ही तिला एनीमानेही साफ करू शकत नाही.'"

207 मी म्हणालो, "तिच्यामध्ये काय आहे याची मला पर्वा नाही! येथे कशाचा तरी, मी एक दृष्टान्त पाहिला आहे! आणि तो मनुष्य ज्याने मला सांगितले, म्हणाला, मी जे काही पाहिले, ते सांगावे आणि ते तसेच होईल. आणि त्याने मला सांगितले आणि माझा त्यावर विश्वास आहे."

208 देवाची स्तुती करा! त्यानंतर काही दिवसांनी ती तिचे धुलाईचे काम करत होती, फिरत होती. तिचे वजन आता सुमारे एकशे पासष्ट पौंड आहे, तब्येत परिपूर्ण आहे.

209 मग जेव्हा मी स्वीकारले, ते निघून गेले. मग रॉबर्ट डॉहर्टीने मला फोन केला. आणि येथून ती बातमी, टेक्सासमधून, जगभर गेली.

210 आणि एका रात्री, सुमारे चार किंवा पाच वेळा बाहेर...मला अन्य भाषेत बोलणे वगैरे समजत नव्हते. मी पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्यावर विश्वास ठेवला, मला विश्वास होता की लोक वेगवेगळ्या भाषेत बोलू शकतात. आणि एके रात्री मी बाहेर फिरत होतो...एका कॅथेड्रलमध्ये, सॅन अँटोनियो, टेक्सास, तिथून बाहेर फिरताना, येथे बसलेला एक भाऊ लहान बंदुकीतून होणाऱ्या गोळीबारासारखा किंवा यांत्रिक तोफेसारखा अन्य भाषेत, वेगाने बोलू लागला. फार काळापूर्वी, फार काळापूर्वी तेथे, एक बंधु उठला आणि, "**प्रभू परमेश्वर असे म्हणतो!** बोलला, व्यासपीठावर जाणारा मनुष्य सर्वशक्तिमान देवाने नियुक्त केलेल्या सेवकाईसह पुढे जात आहे. आणि जसे बाप्तिस्मा करणारा योहान येशू ख्रिस्ताच्या आगमना अगोदर अग्रदूत म्हणून पाठवण्यात आला होता, तसेच तो एक संदेश घेऊन आलेला आहे ज्याद्वारे प्रभु येशू ख्रिस्ताचे दुसरे आगमन होईल."

211 मी माझ्या पायाकडे वाकलो. मी वर पाहिले, मी म्हणालो, "तुम्ही त्या मनुष्याला ओळखता का?"

तो म्हणाला, "नाही, श्रीमान."

मी म्हणालो, "तुम्ही त्याला ओळखता का?"

तो म्हणाला, "नाही, श्रीमान."

मी म्हणालो, "तुम्ही मला ओळखता का?"

तो म्हणाला, "नाही, श्रीमान."

मी म्हणालो, "तुम्ही इथे काय करत आहात?"

212 तो म्हणाला, "मी ते वर्तमानपत्रात वाचले." आणि सहसा...ती सभेची पहिली रात्र होती.

मी तिथे पाहिले आणि म्हणालो, "तू इथे कसा आलास?"

213 म्हणाला, "माझ्या काही लोकांनी मला सांगितले की तू इथे येणार आहेस, 'एक दैवी आरोग्यदाता,' आणि मी आलो."

मी म्हणालो, "तुम्ही सर्व एकमेकांना ओळखत नाही का?"

तो म्हणाला, "नाही."

214 अरे, देवा! तेथे मी पवित्र आत्म्याचे सामर्थ्य पाहिले...जिथे पूर्वी एकदा मला वाटले होते की ते चुकीचे आहे, आणि मला माहित आहे की मी...देवाचा हाच दूत त्यांच्या बरोबर होता ज्यांच्याकडे त्या गोष्टी होत्या. जरी त्यांच्यात खोटेपणा आणि भरपूर भेसळ आणि त्यात गोंधळ होते, पण त्या मध्ये एक अस्सल लेख होता. [टेपवरील रिक्त स्थान—संपा.]...ख्रिस्त. आणि मी पाहिले की तो—तो खरा होता.

215 अरे, वर्षानुवर्षे निघून गेली, आणि सभांमध्ये लोक दृष्टान्त, आणि अशा गोष्टी पाहू लागले.

216 एकदा मी अर्कान्सासमध्ये कुठेतरी उभा असताना एका छायाचित्रकाराने ते छायाचित्रात पकडले, मला विश्वास आहे की, अशा प्रकारच्या सभेत, अशा सभागृहात याविषयी. आणि मी उभा होतो, समजावण्याचा प्रयत्न करत होतो. लोकांना माहीत होते, ते बसून ऐकतील, मेथोडिस्ट, बाप्टिस्ट, प्रेस्बिटेरियन, वगैरे. आणि मग मी दारात येताना, पाहिले, इथे तो आला, जात आहे, "व्हुश, व्हुश!"

217 मी म्हणालो, “मला आता बोलण्याची गरज नाही, कारण तो आता येथे आला आहे.” आणि तो वर गेला आणि लोक ओरडू लागले. मी जिथे होतो तिथे वर आला आणि अवतीभवती स्थिर झाला.

218 तो स्थिरावत असतानाच, एक सेवक धावत आला आणि म्हणाला, “पहा, मी तो पाहिला!” आणि त्याने त्याला आंधळ्या सारखे—सारखे केले, तो डळमळला. त्याचे छायाचित्र तुम्ही पुस्तकात पाहू शकता आणि ते पाहा कारण तो तसाच डळमळला मागे अशा प्रकारे त्याचे डोके खाली होते. तुम्ही त्याचे छायाचित्र पाहू शकता.

219 आणि तिथेच तो स्थिरावला. त्यावेळी वर्तमानपत्राच्या छायाचित्रकाराने ते टिपले. पण परमेश्वर तयार नव्हता.

220 आणि ह्यूस्टन, टेक्सास येथे एका रात्री, जेव्हा, ओह, हजारो पटीने हजारो लोक... आमच्याकडे आठशे...आठ हजारांहून अधिक लोक–तुम्ही–काय–म्हणता, त्या संगीत सभागृहात, महान सॅम ह्यूस्टन कॉलिझियमवर परत या.

221 आणि त्या रात्री त्या वादविवादात, जेव्हा एका बाप्टिस्ट प्रचारकाने म्हटले मी “एक खालच्या पातळीचा ढोंगी आणि एक तोतया, धार्मिक तोतया ह्या खेरीज काहीच नाही, आणि शहराबाहेर पळून गेले पाहिजे” आणि तो त्यातला एक आहे ज्याने ते केलेच पाहिजे.

222 भाऊ बॉसवर्थ म्हणाले, “भाऊ ब्रॅन्हम, तुम्ही असे काही होऊ द्याल का? त्याला थांबवा!”

223 मी म्हणालो, “नाही, श्रीमान, मी अनावश्यक बडबड करण्यावर विश्वास ठेवत नाही. सुवार्ता बडबड करण्यासाठी बनवलेली नाही, ती जगण्यासाठी बनवलेली आहे.” आणि मी म्हणालो, “तुम्ही त्याला कितीही पटवून दिले तरी तो त्याच मार्गाने जाईल.” मी म्हणालो, “तो...त्याला काही फरक पडणार नाही. जर देव त्याच्या हृदयाशी बोलू शकत नाही, तर मी कसे बोलू?”

224 दुसऱ्या दिवशी ते बाहेर आले, म्हणाला, “ते प्रकट करते की ते कशापासून बनलेले आहेत,” ह्यूस्टन क्रॉनिकल. म्हणतो, “ते कशापासून बनलेले आहेत हे दर्शविते, ते जे उपदेश करत आहेत ते स्वीकारण्यास ते घाबरतात.”

225 वयस्कर भाऊ बॉसवर्थ माझ्याकडे आले, तेव्हा ते वयाच्या सत्तरीत असताना, प्रिय वृद्ध भाऊ, त्याचा हात माझ्याभोवती ठेवत म्हणाला, “भाऊ ब्रॅन्हम,” तो म्हणाला, “तुला असे म्हणायचे आहे की तु ते घेणार नाहीस?”

226 मी म्हणालो, “नाही, भाऊ बॉसवर्थ. नाही, श्रीमान. मी ते हाती घेणार नाही.” मी म्हणालो, “त्याने काही चांगले होणार नाही.” मी म्हणालो, “जेव्हा आम्ही व्यासपीठ सोडतो तेव्हा फक्त गोंधळ होतो.” मी म्हणालो, “मी आता एक सभा घेत आहे, आणि मला सर्व गोष्टी अशा प्रकारे फाडून टाकायच्या नाहीत.” मी म्हणालो, “फक्त त्याला पुढे जाऊ द्या.” मी म्हणालो, “इतकंच, तो फक्त बडबडतोय.” मी म्हणालो, “आम्ही त्यांच्याशी आधी बोललो होतो, आणि त्यांच्याशी बोलण्याने काही फायदा होत नाही.” मी म्हणालो, “ते स्वतःचीच मते धरून, पुढे जातील.” मी म्हणालो, “जर त्यांना एकदा सत्याचे ज्ञान प्राप्त झाले आणि तरीही ते त्याचा स्वीकार करणार नाही, बायबलमध्ये म्हटले आहे की त्यांनी विभक्त रेषा ओलांडली आहे आणि त्यांना या जगात किंवा भविष्यात कधीही क्षमा केली जाणार नाही. ते त्यास ‘भूत’ असे संबोधतात आणि ते काही मदत करू शकत नाहीत. त्यांना धार्मिक आत्म्याने पछाडले आहे जो सैतान आहे.”

227 सैतानाचा आत्मा धार्मिक असतो, हे खरे आहे हे किती जणांना माहीत आहे? होय, श्रीमान, ते तितकेच मूलभूत असू शकतात. आणि म्हणून, जेव्हा, मी म्हटले "मूलभूत," ते फार चांगले झाले नाही पण ते खरे आहे. "सुभक्तीचे बाह्य स्वरूप घेणे आणि त्याचे सामर्थ्य नाकारणे." ते बरोबर आहे. चिन्हे आणि चमत्कार हे नेहमी, देवाला सिद्ध करतात. आणि तो म्हणाला की शेवटच्या दिवसांतही असेच होईल. आणि लक्ष द्या!

228 वयस्कर भाऊ बॉसवर्थ, मी...ते माझ्याबरोबर येणार होते, आणि ते जरा थकले होते. नुकताच जपानहून परत आले होते. ते इथे येणार होते. ते माझ्यासोबत लुबॉकमध्ये येणार होते. आणि म्हणून ते होते...त्याला थोडीशी, फार सर्दी झाली होती, त्यामुळे तो आणि त्याची पत्नी यावर येऊ शकली नाही. आणि म्हणून ते...

229 सर्वांना वाटले की तो केलेबसारखा दिसतो. तो तिथेच उभा राहिला, तो म्हणाला, "बरं, भाऊ ब्रॅन्हम," तो अतिशय प्रतिष्ठित देखावा, तुम्हाला माहिती आहे, तो म्हणाला, "मला ते करू द्या," आणि म्हणाला, "जर आपली इच्छा नसल्यास."

230 मी म्हणालो, "ओ ब्रदर बॉसवर्थ, माझी—माझी इच्छा नाही की तुम्ही ते करावे. तुम्ही गोंधळात जाल."

तो म्हणाला, "गोंधळाचा एक शब्द ही असणार नाही."

231 आता, मी बंद करण्यापूर्वी, हे लक्षपूर्वक ऐका. तो तिथे खाली गेला. मी म्हणालो, "जर तुम्ही गोंधळणार नाहीत, तर ठीक आहे."

म्हणाले, "मी गोंधळ न करण्याचे वचन देतो."

232 त्या रात्री त्या सभागृहासाठी सुमारे तीस हजार लोक जमले होते. बंधू वुड, येथे बसलेले आहेत, त्यावेळी उपस्थित होते, आणि त्या सभागृहात बसले होते. आणि मी...

233 माझा मुलगा म्हणाला, किंवा...माझी पत्नी म्हणाली, "तुम्ही त्या सभेला जाणार नाही का?"

234 मी म्हणालो, "नाही. मी तिथे खाली जाऊन त्यांचा गोंधळ ऐकणार नाही. नाही, श्रीमान. मी तिथे जाऊन ते ऐकणार नाही."

जेव्हा रात्र झाली, कोणीतरी बोलले, "तिथे खाली जा."

235 मला टॅक्सी मिळाली, माझा भाऊ, पत्नी आणि माझी मुले, आम्ही खाली गेलो. आणि मी बाल्कनीत तिसाव्या नंबरावर गेलो होतो, तितक्याच उंचावर, आणि खाली बसलो.

236 वयस्कर भाऊ बॉसवर्थ एखाद्या जुन्या मुत्सद्द्याप्रमाणे तिथून बाहेर पडले, तुम्हाला माहिती आहे. त्याने काही कॉपी केल्या होत्या...बायबलची सहाशे वेगवेगळी अभिवचने त्याने तिथे उतरून आणली होती. ते म्हणाले, "आता, डॉक्टर बेस्ट, जर तुम्ही इथे वर येऊन आणि यापैकी एक वचन घेऊन आणि बायबलद्वारे ते चुकीचे आहे हे सिद्ध करा. यातील प्रत्येक वचन बायबलमध्ये आहे, जे येशू ख्रिस्ताने या दिवसात आजारी लोकांना बरे केले त्याविषयीचे आहे. जर तुम्ही यापैकी एखादे वचन घेऊ शकत असाल आणि, बायबलद्वारे, बायबल विरुद्ध असल्याचे प्रतिपादन कराल, तर मी खाली बसेन, तुमच्याशी हस्तांदोलन करीत, म्हणेन, 'तू बरोबर आहेस.'"

237 तो म्हणाला, "मी तिथे गेल्यावर याची काळजी घेईन!" त्याला शेवटचे हवे होते जेणेकरून तो बंधू बॉसवर्थला खोडू शकेल, पहा.

238 म्हणून बंधू बॉसवर्थ म्हणाले, "बरं, बंधु बेस्ट, मी तुला एक विचारतो, आणि जर तुम्ही मला उत्तर द्याल 'होय' किंवा 'नाही,'" म्हटले, "आपण आत्ताच वाद मिटवू."

आणि तो म्हणाला—तो म्हणाला, "मी याची काळजी घेईन!"

त्याने मॉडरेटरला विचारले की तो त्याला विचारू शकतो का. म्हणाली, "होय."

239 तो म्हणाला, "बंधू बेस्ट, यहोवाची मुक्ती देणारी नावे येशूला लागू होतात का? 'होय' किंवा 'नाही'?"

240 त्यावर तोडगा निघाला. ते सर्व होते. मी तुम्हाला सांगतो, मला असे वाटले की माझ्याद्वारे काहीतरी चालले आहे. मी कधीच विचार केला नाही, स्वतः, पहा. आणि मला वाटलं, "अरे, तो उत्तर देऊ शकत नाही! विवाद मिटला."

तो म्हणाला, "बरं, डॉक्टर बेस्ट, मी आहे—मला समजले आहे."

तो म्हणाला, "मी त्याची काळजी घेईन!"

241 म्हटले, "मला समजले आहे की तुम्ही माझ्या सर्वात कमकुवत प्रश्नाचे उत्तर देऊ शकत नाही." तो काकडीसारखा थंड होता, आणि तो कुठे उभा आहे हे त्याला माहीत होते. म्हणून मग तो त्या शास्त्रलेखासह तिथेच बसला.

म्हटले, "तुमची तीस मिनिटे घ्या, मी नंतर उत्तर देईन!"

242 आणि वृद्ध बंधू बॉसवर्थ तेथे बसले आणि ते पवित्र वचन घेतले आणि त्या मनुष्याला अशा जागी बांधून ठेवले की त्याचा चेहरा इतका लाल होईपर्यंत की तुम्ही जवळजवळ, सामना सोडून जाल.

243 रागाने, तो तिथून उठला, आणि त्याने कागद जमिनीवर फेकले, तिथे उठून कॅम्पबेलाइटचा चांगला उपदेश प्रचार केला. मी बाप्टिस्ट होतो, मला माहित आहे की ते काय विश्वास करतात. तो कधीच...तो पुनरुत्थानावर प्रचार करत होता, "'जेव्हा हे नश्वर अमरत्व धारण करील,' तेव्हा आपल्याला दैवी आरोग्य मिळेल." अरे, देवा! आपण अमर झाल्यानंतर आपल्याला दैवी आरोग्याची काय गरज आहे ("जेव्हा हे नश्वर अमरत्व धारण करते," मृतांचे पुनरुत्थान)? येशूने लाजरवर केलेल्या चमत्कारावरही त्याला शंका होती, तो म्हणाला, "तो पुन्हा मरण पावला, आणि ती फक्त तात्पुरती गोष्ट होती." पहा?

244 आणि जेव्हा तो अशा गोष्टींतून गेला, तेव्हा तो म्हणाला, "त्या दैवी रोग बरे करणाऱ्याला पुढे आणा आणि मला त्याला ते करताना बघू द्या!"

245 तेव्हा त्यांचा लहानसा संवाद सुरू झाला. भाऊ बॉसवर्थ म्हणाले, "भाऊ बेस्ट, मी तुम्हाला विचारलेल्या एका प्रश्नाचे उत्तर देत नाही, याचे मला आश्चर्य वाटते."

246 आणि तेव्हा त्याला खरा उन्माद झाला, तो म्हणाला, "त्या दैवी रोग बरे करणाऱ्याला पुढे आणा आणि मला त्याला ते करताना बघू द्या!"

म्हणाले, "भाऊ बेस्ट, लोकांचे तारण होते यावर तुमचा विश्वास आहे का?"

तो म्हणाला, "नक्की!"

म्हणाले, "तुम्हाला दैवी तारणारा म्हणावे असे तुम्हाला वाटते का?"

म्हणाले, "नक्कीच नाही!"

247 "नाही...ते तुम्हाला दैवी तारणहार बनवणार नाही कारण तुम्ही आत्म्याच्या तारणाचा प्रचार केला."

तो म्हणाला, "बरं, नक्कीच नाही!"

248 म्हणाले, “शरीरासाठी दैवी आरोग्याचा प्रचार करून ते बंधू ब्रॅन्हमला दैवी आरोग्यदाता बनवत नाही. तो दैवी आरोग्यदाता नाही, तो लोकांना येशू ख्रिस्ताकडे निर्देशित करतो.”

249 आणि तो म्हणाला, “त्याला पुढे आणा, मला त्याला ते करताना पाहू द्या! आजपासून, एक वर्षानंतर मला लोकांकडे पाहू द्या, आणि मी यावर विश्वास ठेवतो की नाही हे मी तुम्हाला सांगेन.”

250 भाऊ बॉसवर्थ म्हणाले, “भाऊ बेस्ट, हे कलवरी येथील दुसऱ्या प्रकरणासारखे वाटते, ‘वधस्तंभावरून खाली ये आणि आम्ही तुझ्यावर विश्वास ठेवू.’” पहा?

251 आणि म्हणून, अरे, मग तो खरोखरच संतापला. तो म्हणाला, “मला त्याला करताना पाहू द्या! मला त्याला करताना पाहू द्या!” नियंत्रकांनी त्याला खाली बसवले. तो तेथून निघून गेला, आणि तेथे एक पेन्टेकोस्टल प्रचारक उभा होता, त्याने व्यासपीठावर त्याला मारले. तेव्हा त्यांनी त्याला थांबवले. (म्हणून भाऊ बॉसवर्थ म्हणाले, “येथे, येथे! नाही, नाही.”) त्यामुळे नियंत्रकांनी त्याला खाली बसवले.

252 रेमंड रिची उठला, म्हणाला, “ही दक्षिण बाप्टिस्ट अधिवेशनाची वृत्ती आहे का?” म्हणाले, “तुम्ही बाप्टिस्ट सेवकांनो, साऊथन बॅप्टिस्ट कन्व्हेन्शनने या माणसाला इथे पाठवले होते की तो स्वतःहून आला होता?” ते उत्तर देणार नाहीत. तो म्हणाला, “मी तुला विचारले!” तो त्यांना प्रत्येकाला, ओळखत होता.

253 ते म्हणाले, “तो स्वतःहून येतो.” कारण मला माहित आहे की बाप्टिस्ट देखील, दैवी आरोग्यावर विश्वास ठेवतात. तेव्हा तो म्हणाला, “तो स्वतःहून आला होता.”

254 तर मग येथे काय झाले आहे. तेव्हा बंधू बॉसवर्थ म्हणाले, “मला माहीत आहे की भाऊ ब्रॅन्हम सभेमध्ये आहेत, जर त्यांची येण्याची इच्छा असेल आणि प्रेक्षकांना विदा करावे. तर ठीक आहे.”

तर हॉवर्ड म्हणाले, “तुम्ही शांत बसा!”

मी म्हणालो, “मी शांत बसलो आहे.”

255 आणि तितक्यात काहीतरी सभोवती आले, सभोवती फिरू लागते, आणि मला माहित होते की तो परमेश्वराचा देवदूत होता, म्हणाला “उठ!”

256 सुमारे पाचशे जणांनी *असेच* हात जोडून, एक मार्ग बनवला, व्यासपीठावर उतरावे.

257 मी म्हणालो, “मित्रांनो, मी दैवी आरोग्य देणारा नाही. मी तुमचा भाऊ आहे.” मी म्हणालो, “भाऊ बेस्ट, नाही...” किंवा, “भाऊ बेस्ट,” मी म्हणालो, “माझ्या भावा, तुझा अनादर न करता, अजिबात नाही. तुम्हाला तुमच्या विश्वासाचा अधिकार आहे, तसा मलाही आहे.” मी म्हणालो, “अर्थात, बंधू बॉसवर्थद्वारे उपस्थित केलेला, तुमचा मुद्दा तुम्ही सिद्ध करू शकला नाही हे तुम्हाला दिसते. बायबलमध्ये सर्वश्रुत असलेले, ज्याला त्या गोष्टी माहित आहेत, अशा कोणाकडूनही तुम्ही करू शकला नाही.” मी म्हणालो, “आणि लोकांना बरे करण्याविषयी, भाऊ बेस्ट, मी त्यांना बरे करू शकत नाही. पण मी रोज रात्री इथे असतो, जर तुम्हाला परमेश्वराचे चमत्कार पाहायचे असतील, तर येथे या. तो ते रोज रात्री करतो.”

258 आणि तो म्हणाला, “मला तुम्ही कोणाला तरी बरे करताना पहायला आवडेल आणि मला त्यांच्याकडे पाहू द्या! तुम्ही कदाचित तुमच्या मोहनविद्यने त्यांना संमोहित करीत असाल, पण” म्हणाला, “मला तिथून एका वर्षात ते पहायचे आहे!”

मी म्हणालो, “बरं, भाऊ बेस्ट, तुम्हाला ते तपासण्याचा अधिकार आहे.”

259 तो म्हणाला, “काहीही नाही पण तुम्ही मूर्ख देव–वेड्याचा समुह यासारख्या गोष्टींवर विश्वास ठेवता. बॅप्टिस्ट अशा कोणत्याही मूर्खपणावर विश्वास ठेवत नाहीत.”

260 भाऊ बोसवर्थ म्हणाले, “एक क्षणभर थांबा.” म्हणाले, “या दोन आठवड्यांत येथे, तेथे किती लोक आहेत, ज्यांचे ह्यूस्टन येथील या सुरेख बॅप्टिस्ट चर्चसह चांगले संबंध आहेत, ते हे सिद्ध करू शकते की बंधू ब्रॅन्हम येथे असताना तुम्हाला सर्वशक्तिमान देवाकडून आरोग्य प्राप्त झाले आहे?” आणि तीनशेहून अधिक उभे राहिले. म्हणाले, “त्याबद्दल काय?”

261 त्याने म्हटले, “ते बाप्टिस्ट नाहीत!” म्हणाले, “काय कोणीतरी काही साक्ष देऊ शकेल का, अजूनही ते योग्य ठरत नाही!”

262 म्हणाले, “देवाचे वचन म्हणते की ते योग्य आहे, आणि तुम्ही त्यास विरोध करू शकत नाही. आणि लोक म्हणतात की ते बरोबर आहे, आणि तुम्ही ते मागे घेऊ शकत नाही. मग आपण याबद्दल काय करणार आहात?” अशा प्रकारे, पहा.

263 मी म्हणालो, “भाऊ बेस्ट, मी फक्त सत्य काय आहे ते सांगतो. आणि जर मी सच्चा आहे, तर देव सत्याला पाठिंबा देण्यास बांधील आहे.” मी म्हणालो, “तो देत नसेल तर...जर तो सत्याला पाठिंबा देत नसेल, तर तो देव नाही.” आणि मी म्हणालो, “मी लोकांना बरे करत नाही. माझा जन्म एका—एका दानासह गोष्टी जाणण्यासाठी, त्या घडताना पाहण्यासाठी झाला आहे.” मी म्हणालो, “मला माहित आहे की माझ्याविषयी गैरसमज केला जातो परंतु मी माझ्या मनाची खात्री पूर्ण करण्यापेक्षा अधिक काही करू शकत नाही.” मी म्हणालो, “माझा विश्वास आहे की येशू ख्रिस्त मेलेल्यांतून उठला आहे. आणि जर आत्मा जो येतो आणि दृष्टान्त दाखवतो आणि पुढे, जर त्याबद्दल प्रश्न विचारला गेला असेल, तर आजूबाजूला जा आणि शोधा.” मी म्हणालो, “एवढेच.” पण मी म्हणालो, “पण माझ्यासाठी, मी स्वतःहून काहीही करू शकत नाही.” आणि मी म्हणालो, “जर मी सत्य सांगितले, तर ते सत्य आहे, याची साक्ष देण्यासाठी देव माझ्याशी बांधील आहे.”

264 आणि त्याच वेळी, काहीतरी गेले, “हुशः!” येथे तो आला आहे, खाली आला आहे. आणि अमेरिकन फोटोग्राफर असोसिएशन, ह्यूस्टन, टेक्सासमधील डग्लस स्टुडिओ, तिथे मोठा कॅमेरा सेट करून (त्यांना फोटो काढण्यास मनाई केली आहे), फोटो काढले.

265 जेव्हा ते मिस्टर बेस्टचे फोटो काढायला आले होते, आणि त्याने—त्याने म्हटले, मी तिथे जाण्यापूर्वी, तो म्हणाला, “एक मिनिट थांब! माझ्याकडे इथे सहा चमकदार चित्र आहेत!” तो म्हणाला, “इथे, आता माझे चित्र काढा!” आणि त्याने त्या म्हाताऱ्या सात्विक मनुष्याच्या नाकात बोट घातलं, अशाप्रकारे, म्हटलं, “आता माझा फोटो काढा!” आणि त्यांनी ते केले. मग त्याने आपली मुठ ओढली आणि वर ठेवली, म्हणाला, “आता माझे फोटो काढा!” आणि त्यांनी ते तसे घेतले. त्याच्या फोटोसाठी पोझ देण्यासाठी, मग त्याने असे केले. तो म्हणाला, “तुम्हाला हे माझ्या मासिकात दिसेल!” अशा प्रकारे.

266 बंधू बॉसवर्थ तिथे उभे राहिले आणि काहीही बोलले नाहीत. मग त्यांनी फक्त ह्याचा फोटो काढला.

267 त्या रात्री घरी जाताना, (कॅथोलिक मुलाने ते घेतले), तो या दुसऱ्या मुलाला म्हणाला, तो म्हणाला, “त्याबद्दल तुम्हाला काय वाटते?”

268 तो म्हणाला, “मला माहित आहे की मी त्याच्यावर टीका केली आहे. ती गाठ जी त्या बाईचा गळ्यांतून निघून गेली, मी म्हणालो की त्याने तिला संमोहित केले.” म्हटले, “मी तेथे चुकीचे असू शकतो.”

म्हटले, “त्या फोटोबद्दल तुला काय वाटते?”

“मला माहीत नाही.”

269 त्यांनी ते ऍसिडमध्ये टाकले. हे त्याचे चित्र आहे, तुम्हाला हवे असल्यास तुम्ही त्याला विचारू शकता. ते घरी गेले, तो तिथे बसला आणि सिगारेट ओढली. आत जाऊन बॉसवर्थपैकी एक बाहेर काढले, तो नेगेटिव होता. दोन, तीन, चार, पाच, सहा बाहेर काढले आणि त्यातील प्रत्येक कोरा होता. देव त्याच्या संत वृद्ध माणसाचे तसे फोटो काढण्यास परवानगी देणार नाही त्या ढोंगी माणसाबरोबर, त्याच्या नाकाने किंवा हाताने, नाकाखाली मुठ अशा प्रकारे थरथरताना. तो त्याला परवानगी देणार नाही.

270 त्यांनी त्या पुढचा एक बाहेर ओढला, आणि तो येथे होता. त्यांनी सांगितले, त्या रात्री, त्या मनुष्याला हृदयविकाराचा झटका आला.

271 आणि त्यांनी ह्याचे नेगेटिव वॉशिंग्टन, डीसीला पाठवले. ते कॉपीराइट केलेले होते, परत पाठवले.

272 आणि जॉर्ज जे. लेसी, एफ. बी. आय. चे प्रमुख फिंगरप्रिंटिंग आणि डॉक्युमेंटमध्ये, आणि पुढे, संपूर्ण जगात त्यांतील एक महान व्यक्ती आहे, तेथे आणले आणि कॅमेरा, दिवे, इतर सर्व काही तपासण्यासाठी दोन दिवस ठेवले. आणि जेव्हा आम्ही त्या दुपारी आलो, तेव्हा तो म्हणाला, “आदरणीय ब्रॅन्हम, मी देखील, तुमचा एक समीक्षक होतो.” तो म्हणाला, “आणि मी म्हणालो की हे मानसशास्त्र होते, कोणीतरी सांगितले की त्यांनी ते दिवे आणि अशा गोष्टी पाहिल्या होत्या.” आणि म्हणाले, “तुम्हाला माहीत आहे, पक्के ढोंगी तसे म्हणत असत” (त्याचा अर्थ अविश्वासू असा होता) “‘ती आजूबाजूची चित्रे, ख्रिस्ताभोवती, संतांभोवती असलेले ते प्रभामंडल,’ तो म्हणाला, ‘ते फक्त मानसशास्त्र होते.’” पण म्हणाले, “आदरणीय ब्रॅन्हम, या कॅमेराची यांत्रिक नजर मानसशास्त्र घेणार नाही! प्रकाश दुर्बिणीच्या काचेवर आदळला, किंवा निगेटिववर आदळला, आणि ते तिथे होते.” आणि तो म्हणाला...

273 मी ते त्यांच्याकडे सादर केले. तो म्हणाला, “अहो, साहेब, तुम्हाला माहीत आहे की त्याची किंमत काय आहे?”

आणि मी म्हणालो, “मला माहीत नाही, भाऊ, मला माहीत नाही.” आणि म्हणून तो म्हणाला...

274 “अर्थात, तुम्ही जीवंत असताना ते कधीही लागू होणार नाही, परंतु एके दिवशी, जर संस्कृती पुढे सरकली आणि ख्रिस्तीत्व टिकून राहिले, तर याबद्दल काहीतरी घडेल.”

275 तर, मित्रांनो, आज रात्री, जर ही पृथ्वीवरील आपली शेवटची भेट असेल, तुम्ही आणि मी सर्वशक्तिमान देवाच्या सान्निध्यात बसलो आहोत. माझी साक्ष खरी आहे. बऱ्याच, बऱ्याच गोष्टी, ते लिहिण्यासाठी पुष्कळ पुस्तके लागतील, परंतु माझी इच्छा आहे की तुम्हाला समजावे.

276 चित्राखेरीज, प्रत्यक्षात येथे किती आहेत, ज्यांनी तो प्रकाश मी जिथे प्रचार करत होतो तिथे अवतीभवती स्वतः उभा असताना पाहिला आहे? तुमचे हात वर करा, संपूर्ण इमारतीत, कोणी आहे ज्यांनी तो पाहिला आहे. बघा, येथे बसलेल्यांमध्ये जवळपास आठ-दहा हात वर आहेत.

277 तुम्ही सांगा, “काय ते त्याला आणि मला पाहू शकतात—शकतात आणि तो पाहू शकत नाही?” होय, श्रीमान.

278 तो—तो तारा ज्याचे ते ज्ञानी लोक अनुसरण करीत होते, तो तारा प्रत्येक वेधशाळेतून गेला. त्यांच्याशिवाय तो कोणीही पाहिला नाही. ते एकटेच होते ज्यांनी तो पाहिला.

279 एलीया तिथे उभा राहून त्या सर्व अग्नीवरील रथांकडे, आणि इतर सर्व गोष्टींकडे पाहत होता. आणि गेहजीने आजूबाजूला पाहिले, तो त्यांना कुठेही पाहू शकत नव्हता. देव म्हणाला, “त्याचे डोळे उघडा म्हणजे तो पाहू शकेल.” आणि मग त्याने त्यांना पाहिले, पहा. पण तो एक चांगला मुलगा होता, तिथे उभा राहून आजूबाजूला पाहत होता, पण तो ते पाहू शकत नव्हता. नक्की. हे काहींना पाहण्यासाठी दिले आहे, आणि काहींना नाही. आणि ते खरे आहे.

280 पण आता तुम्ही ज्यांनी ते पाहिले नाही, त्यांनी कधीही पाहिलेले नाही. आणि तुम्ही जे ते तुमच्या नैसर्गिक डोळ्यांनी पाहिले आणि कधीही ते चित्र पाहिले नाही, तरीही जे चित्र पाहतात त्यांच्याकडे तुमच्या नैसर्गिक डोळ्यांनी पाहिलेल्यापेक्षा मोठा पुरावा असतो. कारण, तुमच्या नैसर्गिक डोळ्याने तुमची चूक होऊ शकते, तो एक डोळ्यांचा भ्रम असू शकतो. ते बरोबर आहे का? पण तो एक दृष्टीचा भ्रम नाही, तेच सत्य आहे, जिथे वैज्ञानिक संशोधन सिद्ध करते की तेच सत्य आहे. म्हणून प्रभु येशूने हे केले आहे.

“मग ते काय आहे असे तुम्हाला वाटतं,” तुम्ही सांगा, “भाऊ ब्रॅन्हम?”

281 माझा विश्वास आहे की हा तोच अग्निस्तंभ आहे ज्याने इस्राएल लोकांना मिसरांतून पेलेस्टीनपर्यंत नेले. माझा विश्वास आहे की हा तोच प्रकाशाचा देवदूत आहे जो तुरुंगा मध्ये—मध्ये संत पेत्राकडे आला आणि त्याला स्पर्श केला, आणि पुढे गेला आणि दार उघडले आणि त्याला उजेडात आणले. आणि माझा विश्वास आहे की तो येशू ख्रिस्त काल, आज, आणि युगानुयुग सारखाच आहे. आमेन! तो तोच येशू आज आहे जो तो काल होता. तो सदैव तोच येशू असेल.

282 आणि मी याबद्दल बोलत असताना, तोच प्रकाश त्या चित्रावर आहे…मी आता जिथे उभा आहे तिथून दोन फूटावरही नाही. ते बरोबर आहे. मी त्याला माझ्या—माझ्या डोळ्यांनी पाहू शकत नाही, परंतु मला माहित आहे की तो येथे उभा आहे. मला माहित आहे की तो आता माझ्या आत स्थिरावत आहे. होय! जर तुम्हाला तो फरक कळला असता जेव्हा सर्वशक्तिमान देवाचे सामर्थ्य उतरते, आणि कशा गोष्टी वेगळ्या दिसतात!

283 हे एक आव्हान आहे, कोणीही. मी कोणत्याही आजारी लोकांसाठी प्रार्थना करणार नाही, मी एक घोषणा करणार आहे. पण दृष्टान्त लोकांवर आहे. उह-हह. देव ते जाणतो. मी कोणतीही प्रार्थना रांग बोलवणार नाही, मी तुम्हाला तिथे बसायला सोडणार आहे. तुमच्यापैकी किती लोकांकडे प्रार्थना पत्र नाही? चला आपले हात पाहू या, असे कोणी ज्याच्याकडे प्रार्थनापत्र नाही, ज्याच्याकडे प्रार्थनापत्र नाही.

284 निग्रो बाई इथे बसली आहे, मला दिसत आहे की तुम्ही तुमचे हात वर केले आहेत. ते बरोबर आहे का? फक्त उभे राहा म्हणजे मी तुम्हाला फक्त एक मिनिटात बाहेर काढू शकेन. पवित्र आत्मा काय म्हणेल हे मला माहित नाही, परंतु तुम्ही माझ्याकडे अत्यंत प्रामाणिकपणे पाहत आहात. तुमच्याकडे प्रार्थना पत्र नाही? जर सर्वशक्तिमान देव मला सांगेल की तुझी समस्या काय आहे…मी हे फक्त सुरुवात करण्यासाठी करत आहे, फक्त सुरुवात करण्यासाठी. तुझा माझ्यावर विश्वास आहे का…तुम्हाला माहित आहे की काहीही नाही…माझ्याबद्दल एकही चांगली गोष्ट नाही. जर तुम्ही विवाहित स्त्री असाल, तर मी

तुमच्या पतीपेक्षा जास्त नाही. मी फक्त एक मनुष्य आहे. परंतु येशू ख्रिस्त हा देवाचा पुत्र आहे, आणि त्याने या गोष्टी सिद्ध करण्यासाठी त्याचा आत्मा पाठवला.

285 जर देव मला सांगेल की तुमची काय समस्या आहे (आणि तुम्हाला माहित आहे की मला तुमच्याशी संपर्क साधण्याचा कोणताही मार्ग नाही), तू मनापासून विश्वास ठेवशील का? [बहीण बंधू ब्रॅन्हमशी बोलते—संपा.] देव तुला आशीर्वाद देवो. तर तुझा उच्च रक्तदाब तुला सोडून गेला आहे. तोच तुझ्याकडे होता. ते बरोबर नव्हते का? तर खाली बस.

286 तुम्ही फक्त एकदा विश्वास ठेवा! मी कोणालाही यावर विश्वास ठेवण्याचे आव्हान देतो.

287 इकडे बघ, मला तुम्हाला काही सांगू द्या. मार्था, प्रभु येशूकडे येत आहे. ते दान कधीच कार्यरत झाले नसते...तो काय करणार आहे हे पित्याने त्याला आधीच दाखविले होते. ते कधीच चालले नसते. पण ती म्हणाली, "प्रभु, मी...जर तू इथे असतास, तर माझा भाऊ मेला नसता." म्हणाली, "पण मला माहीत आहे की आताही तु जे काही देवाकडे मागशील ते, देव तुला देईल."

288 तो म्हणाला, "मीच पुनरुत्थान आणि जीवन आहे, जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो मेला असला, तरी तो जिवंत राहील. आणि जिवंत असलेला प्रत्येक जण जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो कधीही मरणार नाही. हे तू खरे मानतेस काय?"

289 ती काय म्हणाली ते ऐका. ती म्हणाली, "होय, प्रभु. माझा विश्वास आहे की तुम्ही जे काही बोललात ते सत्य आहे. माझा विश्वास आहे की तू देवाचा पुत्र आहेस जो जगात येणार होता." हा तिचा दृष्टिकोन आहे, नम्रपणे.

तुला वेगळं वाटतं, नाही का, बाई? होय. ते बरोबर आहे.

290 तुमच्या शेजारी बसलेली ती बाई, अगदी तुझ्या बाजूला, सुद्धा, संधिवात आणि एका स्त्री समस्येने त्रस्त आहे. बाई, ते बरोबर नाही का? लाल ड्रेस घातलेली छोटी बाई, फक्त एक मिनिट उभी राहा. तू खूप जवळ होतीस, दृष्टान्त तुजकडे आला आहे. संधिवात, स्त्री समस्या. ते बरोबर आहे का? आणि इथे तुमच्या आयुष्यात काहीतरी आहे (तुमच्याकडे—तुमच्याकडे एक चांगली सरळ नजर टाकली): तुम्हाला तुमच्या जीवनात खूप चिंता, खूप समस्या आहे. आणि ती समस्या तुमच्या प्रिय व्यक्तीबद्दल आहे, तो तुमचा नवरा आहे. तो मद्यपी आहे. तो चर्चला जात नाही. जर ते बरोबर असेल, तर हात वर करा. बाई, देव तुला आशीर्वाद देवो. आता घरी जा आणि तुझ्या आशीर्वादाचा स्वीकार कर. तु बरी झाली आहेस, तुझ्या भोवती प्रकाश आला आहे.

291 त्याच्या शेजारी बसलेला मनुष्य. तुम्ही, श्रीमान, तुमचा विश्वास आहे? [भाऊ म्हणतो, "होय. मी करतो."—संपा.] मनापासून? ["होय श्रीमान."] तुम्ही तुमची एक संवेदनशक्ति गमावली आहे. ही वास घेण्याची क्षमता आहे. ते बरोबर नाही का? तसे असल्यास, आपला हात हलवा. ["ते बरोबर आहे."] आपला हात तोंडापर्यंत ठेवा, *अशा* प्रकारे, म्हणा, "प्रभु येशू, मी पूर्ण हृदयापासून तुझ्यावर विश्वास ठेवतो." ["प्रभु येशू, मी पूर्ण हृदयापासून तुझ्यावर विश्वास ठेवतो."] देव तुम्हाला आशीर्वाद देवो. आता जा. तुम्हाला तुमचे आरोग्य प्राप्त होईल.

292 देवावर विश्वास ठेवा! त्याबद्दल तुम्हाला काय वाटते, मागे तिथे? तुमचा विश्वास आहे का? आदर बाळगा!

293 तिथे कोपऱ्यात एक बाई बसलेली आहे. मला तो प्रकाश तिच्यावर आलेला दिसत आहे. मी त्याबद्दल काय सांगू शकतो हा एकमेव मार्ग आहे, तो प्रकाश लटकत आहे. *हा* प्रकाश इथेच त्या बाईवर लटकत आहे. कदाचित एका मिनिटात, ते काय आहे ते मी

पाहू शकतो. तो खंडित होईल...ती स्त्री हृदयविकाराने—ने पीडित आहे. ती माझ्याकडे पाहत आहे.

294 आणि तिचा नवरा तिच्या शेजारी बसला आहे. आणि तिच्या पतीला काही आजार झाला आहे, तो नुकताच आजारी, अस्वस्थ, आजारी आहे. श्रीमान, ते बरोबर नाही का? ते खरे असल्यास आपले हात वर करा. बरोबर आहे, बाई, तूच आहेस, तिथे लहान स्कार्फसह. श्रीमान, ते बरोबर नाही का? आज तुम्ही जरा अस्वस्थ तर झाला नाही ना? तुझ्या पोटात अस्वास्थ आहे, तो मनुष्य. ते बरोबर आहे.

295 तुम्ही दोघही, मनापासून विश्वास करता का? तुम्ही ते स्वीकारता? श्रीमान, मी तुम्हाला सांगतो, तुम्हीही, मी तुमचा हात वर असलेला पाहात आहे, धूम्रपानाची सवय आहे. ते करणं सोडा. तुम्ही सिगार ओढता, तुम्ही ते करू नये, तुम्हाला आजारी पाडते. ते बरोबर नाही का? तसे असल्यास, आपला हात अशा प्रकारे हलवा. हेच तुम्हाला अस्वस्थ करते. हे तुमच्या मज्ञातंतूंवर वाईट आहे. ओंगळ गोष्टी फेकून द्या आणि यापुढे ते करू नका, आणि तुम्ही त्यावर मात कराल आणि ठीक व्हाल, आणि तुमच्या पत्नीच्या हृदयाचा त्रास तिला सोडून जाईल. तुमचा विश्वास आहे? ते बरोबर नाही का? मी तुला इथून पाहू शकत नाही, आणि तुला ते माहित आहे, पण तुम्ही सिगार वाहत आहात... मध्ये—मध्ये तुमच्या समोरच्या खिशात. ते बरोबर आहे. वस्तू बाहेर टाका आणि तुमचा हात तुमच्या बायकोवर ठेवा, देवाला सांगा की तुम्ही अशा गोष्टींसह आहात. तुम्ही बरे होऊन घरी जाल, तू आणि बायको बरे होतील. प्रभू येशूचे नाव धन्य असो!

तुम्ही मनापासून विश्वास ठेवता?

296 इथे बसलेली ही छोटी बाई माझ्याकडे बघत आहे. आपण वर...तिथे समोरच्या सीटवर, इथे बसलेली. एक बाई त्या सह...माझ्याकडे बघत आहे, ती तेथे बसली आहे. तुमच्याकडे नाही...बाई, तुमच्याकडे प्रार्थना कार्ड आहे, येथे ना? तुमच्याकडे कोणतेही प्रार्थनापत्र नाही का? तुम्ही मनापासून विश्वास ठेवता का? तुमचा विश्वास आहे की येशू ख्रिस्त तुम्हाला बरे करू शकतो?

297 तुला त्या विषयी काय वाटतं, तुला तिच्या शेजारी बसलेली? बाई, तुझ्याकडे प्रार्थना कार्ड आहे का? तुमच्याकडे नाही का? तुला पण, बरे व्हायचे आहे का? तुझा पोटाचा त्रास निघून गेला म्हणून पुन्हा पूर्वीसारखे खायला जायला आवडणार नाही का? आता येशू तुम्हाला बरे करतो यावर तुमचा विश्वास आहे का? जर तुमचा विश्वास असेल की येशू ख्रिस्ताने तुम्हाला बरे केले तर उभे रहा. तुमच्या पोटात व्रण होते, नाही का? हे चिंताग्रस्त स्थितीमुळे होते. आपण बऱ्याच काळापासून चिंताग्रस्त आहात. विशेषत: आम्ल आणि गोष्टी, किंवा मला म्हणायचे आहे की आम्ल तयार करते, आणि ते तुमचे दात संवेदनशील बनवतात जेव्हा तुम्ही ढेकर देता तुमचे अन्न तोंडात परत आणता. ते सत्य आहे. होय, श्रीमान. हा पेप्टिक अल्सर आहे, तो तुमच्या पोटाच्या खालच्या भागात होता. तेथे कधीकधी जळजळ होते विशेषतः टोस्ट बरोबर बटर खाल्ल्यानंतर. ते बरोबर आहे? मी तुमच्या मनातले वाचत नाही, पण पवित्र आत्मा अचुक आहे. तू आता बरी झाली आहेस. घरी जा, बरी हो.

298 या दिशेने तुम्ही मागे असलेले तुमचे काय? तुमच्यापैकी काही जण तेथे प्रार्थनापत्रा शिवाय आहेत, हात वर करा. प्रार्थना पत्र नसलेले कोणी आहेत. ठीक आहे, आदर करा, तुमच्या पूर्ण मनाने विश्वास ठेवा. वर बाल्कनीत आहेत त्यांचे काय? देवावर विश्वास ठेवा.

299 मी हे स्वतःहून करू शकत नाही, ही केवळ त्याची सार्वभौम कृपा आहे. तुमचा विश्वास आहे का? तो मला दाखवतो तसे मी सांगू शकतो. जसे तुमचा विश्वास...तुमचा

विश्वास हालविण्यासाठी मी हे म्हणतो, मग तो मला कोणत्या मार्गाने नेतो ते पहा. तुमच्या लक्षात आले का हा—हा तुमचा भाऊ नाही? तुम्ही त्याच्या उपस्थितीत उभे आहात. हे मी करीत नाही, तर तुमचा विश्वास कार्य करीत आहे. मी त्याला चालवू शकत नाही. तुमचा विश्वास ते करीत आहे. माझ्याकडे ते कार्य करण्याचा कोणताही मार्ग नाही. फक्त एक मिनिट.

300 या कोपऱ्यात मला एक कृष्णवर्णीय मनुष्य बसलेला दिसतो, एक प्रकारचा प्रौढ, चष्मा लावलेला. तुमच्याकडे प्रार्थनापत्र आहे, श्रीमान? एक मिनिट आपल्या पायावर उभे रहा. काय तुम्ही, तुमच्या संपूर्ण हृदयाने, विश्वास करता की मी देवाचा सेवक आहे? तुम्ही दुसऱ्या कोणाचा तरी विचार करीत आहात, नाही का? ते बरोबर असेल तर तुमचा हात हलवा. मी, तुझा भाऊ आहे म्हणून नाही. आता, तुमच्याकडे प्रार्थना पत्र नाही. तुम्हाला कधीही रांगेत येण्याचा कोणताही मार्ग नसेल, कारण तुमच्याकडे प्रार्थना पत्र नाही. आता, जर तुमच्यापैकी कोणाकडे प्रार्थनापत्रे असतील तर, करू नका—करू नका—उठू नका, पहा, कारण तुम्हाला रांगेत येण्याची संधी मिळेल.

301 पण मला तो प्रकाश त्याच्यावर लटकलेला दिसतो. तो अद्याप दृष्टांतांत बदललेला नाही. मी तुला बरे करू शकत नाही, भाऊ, मी करू शकत नाही. हे फक्त देवच करू शकतो. पण तुझा…तुझा…तुझ्याकडे विश्वास आहे. तुझा विश्वास आहे. आणि तेथे काही आहेत—काहीतरी, ते आहे—ते कारणीभूत आहे, काही अंशी.

302 जर सर्वशक्तिमान देव या मनुष्याला त्याचा त्रास काय आहे हे सांगेल, तर बाकीच्यांना तुमचे आरोग्य मिळेल का? तेथे एक मनुष्य आहे, जो माझ्यापासून दहा, पंधरा यार्ड दूर उभा आहे, मी त्याला माझ्या आयुष्यात कधीही पाहिले नाही. तो तिथे उभा असलेला केवळ एक मनुष्य आहे. जर सर्वशक्तिमान देव त्या मनुष्याची काय समस्या आहे ते प्रकट करील, तर तुमच्यापैकी प्रत्येकाने येथे एक चांगला मनुष्य म्हणून चालले पाहिजे. देव आणखी काय करू शकतो? ते बरोबर आहे का?

303 श्रीमान, तुम्हाला काहीच त्रास नाही. तुम्ही अशक्त आहात, रात्री थोडे उठता, मूत्राशयाची ग्रंथी वगैरे वगैरे, पण ती तुमची समस्या नाही. तुमची समस्या तुमच्या मुलाबद्दल आहे. आणि तुमचा मुलगा एखाद्या प्रकारच्या राज्य संस्थेत आहे, आणि त्याच्याकडे दुहेरी व्यक्तिमत्व आहे. ते बरोबर आहे का? ते बरोबर असल्यास हात हलवा. ते अगदी बरोबर आहे.

304 देवाचा पुत्र येशू ख्रिस्त येथे उभा आहे यावर आता किती जण विश्वास ठेवतात? चला उभे राहून स्तुती करू या आणि आपले आरोग्य प्राप्त करू या.

305 सर्वशक्तिमान देव, जीवनाचा लेखक, प्रत्येक उत्तम देणगी देणारा, तु इथे आहेस, तोच प्रभु येशू ख्रिस्त, तोच काल, आज, आणि युगानुयुग सारखा आहे.

306 आणि, सैताना, तू या लोकांना खूप काळ फसविले आहेस, त्यांच्यातून बाहेर ये! मी तुला त्या जिवंत देवाची शपथ देतो ज्याची उपस्थिती अग्नीच्या स्तंभाच्या रूपात आहे, या लोकांना सोड! आणि येशू ख्रिस्ताच्या नावाने त्यांच्यातून बाहेर ये!

307 तुमच्यापैकी प्रत्येकाने आपले हात वर करून देवाची स्तुती करा, आणि प्रत्येकजण, आपले आरोग्य स्वीकारा.

***कसा तो दूत माझ्याकडे आला, आणि त्याची सेवकाई*** MAR55-0117

(How The Angel Came To Me, And His Commission)

हा संदेश, भाऊ विल्यम मिरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, सोमवार संध्याकाळी, 17 जानेवारी, 1955, रोजी, लेन टेक हायस्कूल शिकागो, इलीनॉईस, यू. एस. ए., येथे प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेरेकॉर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. हा मराठी अनुवाद व्हॉईस ऑफ गॉड रेकॉर्डिंगद्वारे छापला आणि वितरित करण्यात आला.

MARATHI

©2023 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## <u>छपाईच्या हक्काची सूचना</u>

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice Of God Recordings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.



VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org